
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

छात्र प्रबोधनचा ४०० वा अंक

दीपावली विशेषांक २०२५

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक, शके १९४७ । वर्ष २६ अंक २
वार्षिक वर्गणी ₹ ३५०, मूल्य ₹ १२०, पृष्ठे – १३६



# संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

**सर्वप्रथम दिवाळी व नूतन संवत्सराच्या हार्दिक शुभेच्छा!**

**विविधांगी व दर्जेदार साहित्याने नटलेला छात्र प्रबोधनचा हा चौतीसावा दिवाळी अंक तर** एकूण **छात्र प्रबोधनच्या वाटचालीतला ४०० वा अंक!!** या अंकासोबतच **इंग्रजी दिवाळी अंक** व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी **'सुबोध' दिवाळी अंकही** प्रकाशित केले आहेत. त्याचबरोबर खास **कुमारांसाठी २०२६ ची दिनदर्शिकाही** प्रकाशित झाली आहे. गावोगावचे केंद्रप्रमुख, कार्यकर्ते, प्रबोधन दूत, शिक्षक, विद्यार्थी यांमुळे महाराष्ट्रातील **सुमारे चाळीस हजार** घरांपर्यंत हे साहित्य पोहोचत आहे. लेखक व चित्रकारांच्या सहकार्यामुळे अंकाची गुणवत्ता राखता आली. तसेच अनेकांच्या अर्थसाहाय्यामुळे हे सर्व साहित्य अत्यंत सवलतीच्या दरात हजारो विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकलो, याचा विशेष आनंद वाटतो! दिवाळीच्या खमंग फराळाबरोबरच विचारांना आणि कृतीला चालना देणारा हा 'साहित्य फराळ' तुमची दिवाळी अधिक अर्थपूर्ण, समृद्ध करेल, असा विश्वास वाटतो.

या अंकात कथा, कविता, ललित, माहितीपर लेख तुम्ही वाचालच! याशिवाय **'माझी बंडखोरी'** ही विशेष **लेखमाला** देखील आहे. 'बंडखोरी' करणं म्हणजे काय? ती का करायला हवी? ती 'चांगली' की 'वाईट' हे कसं ठरवायचं? 'बंडखोर' कोणाला म्हणायचं? स्वत:पासून ते समाजापर्यंत काही चांगले, विधायक बदल घडवून आणण्याची ताकद असणाऱ्या बंडखोरीकडे शालेय वयापासूनच कसं पाहायला हवं, या प्रश्नांची उकल या लेखमालेद्वारे तुम्हाला होईल. तीन कर्तृत्ववान व्यक्तींचे अनुभव तुम्ही या लेखमालेत वाचणार आहात. 'बंडखोरी'ने त्यांच्यात कोणते बदल घडले? बंडखोरीनं त्यांना काय दिलं? असं कोणतं शहाणपण त्यांच्या गाठीशी आलं इ. प्रश्नांची उत्तरं मिळवा. या निमित्ताने तुमच्या आसपासचे असे बंडखोर लोक शोधा. त्यांचे बंडखोरीचे अनुभव जाणून घ्या!

'निव्वळ 'मासिक' नव्हे, कुमारांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ' हे आपलं 'ब्रीद' मानून गेली ३३ वर्षे 'छात्र प्रबोधन' कुमार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी, त्यांना अभिरुचीसंपन्न करण्यासाठी तळमळीने, पाय रोवून उभा आहे. 'छात्र प्रबोधन'च्या वाटचालीतला **हा दिवाळी अंक ४०० वा अंक म्हणून सज्ज झाला आहे.** त्याप्रीत्यर्थ या दिवाळी अंकात **'प्रबोधनाचे अक्षरलेणे' हा विशेष विभाग** तुम्ही वाचाल. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पासाहेब पेंडसे यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी, मासिकाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ सुरू करणारे, मासिकाचे सुरुवातीपासूनचे प्रयोगशील संपादक मा. महेन्द्रभाई यांनी या वाटचालीचा पट उलगडून दाखवला आहे. एखादं कुमार मासिक सातत्यानं, दीर्घकाळ प्रकाशित होण्यासाठी कशाप्रकारे आटापिटा करावा लागतो, सचोटीनं काम करताना अनेकांचे हात या कार्याला कसे लाभतात, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीयत्वाची जाणीव वाढवण्यासाठी, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी 'मासिक' या माध्यमाचा 'साधन' म्हणून कसा प्रभावी उपयोग करून घेता येतो, याची प्रचीती या विभागातील लेखक, कार्यकर्ते, वाचक, शिबिरार्थी, संपादक मंडळातील सदस्य यांची प्रातिनिधिक स्वरूपातील मनोगतं वाचून तुम्हाला येईल. त्यातून या चळवळीत तुमचा कृतिशील, सक्रिय सहभाग नोंदवण्याची प्रेरणा तुम्हाला नक्की मिळेल, असा विश्वास वाटतो.

मित्र-मैत्रिणींनो, समाजमाध्यमांच्या गोंधळात हरवून न जाता, स्वत:चं व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी आणि त्याला सत्कार्याची अर्थात स्वत:च्या व इतरांच्या हिताच्या कृतीची जोड देत, तुम्ही अधिक अनुभवसंपन्न होण्यासाठी 'छात्र प्रबोधन' तुमच्या साथीला आहेच! यापुढेही सदैव राहील...! स्वत:च्या विकासाबरोबरच आपण ज्या समाजात राहतो, त्याचा विकास करणं हेही तुमचं ध्येय असू दे!!

**प्रसंगी 'बंडखोर' होऊन आपल्या आसपासचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करण्याची प्रेरणा या दिवाळीच्या निमित्ताने तुम्हाला मिळो, या शुभेच्छांसह...**

**तुमची,**
**शिल्पाताई**

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
मल्हार अरणकल्ले
स्वाती ताडफळे

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**संपादन साहाय्य**
श्वेता कुलकर्णी

**अक्षर जुळणी**
मनीषा पेटकर
कीर्ती खिचडे

**जाहिरात मांडणी**
पद्मजा जोशी

**मुखपृष्ठ**
दत्तात्रय पाडेकर

**मांडणी/सजावट**
राहुल धामणे

**चित्रकार**
गिरीश सहस्रबुद्धे,
दीपक संकपाळ,
कुडल हिरेमठ, चित्रांजली,
सायली कुलकर्णी

**शीर्षक लेखन**
बाबू उडूपी

**अर्थ संकलन**
वेदा भागवत
श्रुती गोखले
अपर्णा घाटे

**प्रचार व वितरण**
रूपाली बापट
ज्योती चौधरी
ज्योती पवार
उन्नती सोनदे
विक्रम राठोड
गावोगावचे केंद्रप्रमुख
कार्यकर्ते, प्रबोधन दूत
विद्यार्थी, शिक्षक




दिवाळ अंकातील कल्पक भेट
'आकर्षक आकाशकंदील'
(कृती पान क्र. १२३ वर पाहा)


## छात्र प्रबोधन मासिकाविषयी...

**छात्र प्रबोधन** – ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी
कृतिशीलता जोपासणारे मासिक!
विद्यार्थ्यांच्या विकासाची चळवळ!!
सौर कार्तिक | शके १९४७ || वर्ष २६ | अंक २
एकूणात ४०० वा अंक, वर्ष ३४ अंक ४
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर १६ आश्विन, शके १९४७
८ ऑक्टोबर २०२५
**या अंकाची किंमत :** ₹ १२०
**वार्षिक वर्गणी :** ₹ ४०० (दिवाळी अंकासह)
स्पीडपोस्ट/कुरिअरने अंक पाठविण्यासाठी
अतिरिक्त खर्च ₹ ३००
**वर्गणी भरण्यासाठी व प्रकाशने खरेदीसाठी**
**www.jpprakashane.org**



**संपर्क पत्ता :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०. ☎ ०२०-२४२०७१७४/१७५
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org


**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**
* हे लेख QR कोडला जोडले आहेत, ते स्मार्टफोनवर स्कॅन करा. त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR Code Scanner मोफत डाऊनलोड करा.

## विशेष लेख


३९. युद्धः सैनिकांचे आणि नागरिकांचे – वाच. अजित कानिटकर
९५. 'संयमा'चं उलगडलेलं कोडं! – स्वप्नीला सेठिया


## विज्ञान-कला-कृतिपर




१८. कागदी कमळ – अनादी बेडेकर
६१. कागदी कपांची 'बनाना किक' – राघव जोशी


## मुलांचे पान


१०७. 'फुलले ऋतू' – पुस्तक परिचय – कु. शारदा मंजुळे
१०९. कविता – माणसा रे माणसा – चि. मधूर पित्रे


## कल्पक स्पर्धा


३८. राज्यस्तरीय सांघिक अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धा
१२३. 'सफर दीपावली विशेषांकाची' वैयक्तिक स्पर्धा

**याशिवाय** – ३. संवाद १२. ओळखा पाहू काव्यकोडी!
१४. शब्दकोडे, करून तर पाहा
६२. पक्षी जगतातील विक्रमवीर

➤ **ज्ञान प्रबोधिनीविषयी** – ६. विज्ञानभिमुखता
८४. आजची प्रबोधिनी
१२५. पद्य* – मनामनातून आज गर्जू दे...
– वाच. अनघा लवळेकर

➤ **प्रकाशने सूची** – २२. कुमारांसाठी पुस्तक सूची*
३३. रसग्रहणात्मक व प्रेरणादायी संग्रह सूची
८३. एक व सहा पानी पुस्तक संच १०६. व्यक्तिविकसनपर पुस्तके
११८. ललित लेखसंग्रह

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

## ४०० वा अंक

## दीपावली विशेषांक

शके १९४७/इ.स.२०२५

# अंतरंग

## कविता




१३. गे मायमराठी – संजीवनी बोकील
दीपावली – मुबारक शेख
१३. ✼ ऐका–कविता–काळीज संत जनांचे – संजीवनी बोकील
४३. दिवाकर – श्रेयस फापाळे
८३. झाड व्हावं लागतं! – दुर्गेश सोनार
९९. बीज अंकुरले तान्हे – आश्लेषा महाजन
९९. ✼ ऐका–कवितेचं रसग्रहण – आश्लेषा महाजन


## ललित




१९. दिव्याच्या थेंबभर उजेडात मी कवी झालो – ऐश्वर्य पाटेकर
२१.✼ ऐका–नाट्यछटा–माणुसकीचा झरा – एकनाथ आव्हाड
३३. मोहीम रूपकुंड – अवधूत गुरव
३७.✼ पाहा–रूपकुंड ट्रेक चित्रफीत
८५. स्वप्नातली शाळा – शैलजा देशमुख


## लेखमाला - 'माझी बंडखोरी'


४७. ✼ वाचा–जडणघडणीपर लेख – भीमराव गस्ती
४८. 'का' ची उत्तरं शोधताना... – सीमंतिनी खोत
५०. 'मन'भर आनंद देणारी बंडखोरी! – आबा महाजन
५३. हजारोंच्या आयुष्यात बदल घडवणारी कथा – सुधा कोठारी


## माहितीपर लेख




१५. अवकाश स्थानकावर राहायचं आहे? – मेघश्री दळवी
१७. ✼ पाहा–अवकाश यानातील अनुभव – सुनिता विल्यम्स
११५. हिबोकु जुमोकु – डॉ.कांचनगंगा गंधे
११७. ✼ पाहा–लेखातील झाडांविषयी माहिती देणारी रंजक चित्रफीत


## कथा




७. काय बोलता? – स्वाती राजे
१२.✼ ऐका–कथा–टूक टूक टूक – डॉ. अनघा भट
२५. विचित्र मोहीम – भारत सासणे
११४. ✼ वाचा–कथा – शिकस्त – डॉ. संजय ढोले
५५. त्या दिवाळीची गोष्ट: – डॉ. प्रसन्न दाभोळकर
८९. ऑपरेशन फिनाले – रवींद्र गुर्जर
९३. ✼ ऐका–लेख–स्वीकारण्यातली मौज– माधवी घारपुरे
१०३. मी पण हुशार आहे – नीलम माणगावे


## विशेष विभाग... 'प्रबोधनाचे अक्षरलेणे'


६७. ४०० व्या अंकाच्या निमित्ताने... – महेन्द्र सेठिया
६८. मूल्यसंस्कार जोपासणाऱ्या प्रयोगशाळेत... – प्रवीण दवणे
७०.✼ वाचा–छात्र प्रबोधन तपपूर्ती विशेषांक
७१. 'छात्र प्रबोधन' आणि मी – राम जोशी
७३. ...पाठ्यपुस्तकांतील मुशाफिरी – स्वाती ताडफळे
७५. ...चारशे समर्थ पावलं. – मल्हार अरणकल्ले
७७.✼ ऐका–छात्र प्रबोधन अनुभव – प्रसाद सांडभोर
७८. दिवाळी अंकाच्या बोलक्या प्रतिक्रिया
७८.✼ वाचा–लेखमाला–गोष्ट माझी २५ वर्षांची
७९. वाचक, कार्यकर्ती ते कार्यकारी संपादक – दीपाली गोगटे
८०.✼ वाचा – छात्र प्रबोधनचा २५ वर्षांचा आढावा
८०. 'छात्र प्रबोधन' अनुभवांची खाण – मृण्मयी वैशंपायन
८२. ...विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन – दिगंबर गिरीबुवा


वाचा
छात्र प्रबोधन
दिवाळी अंक २०२४

# ज्ञान प्रबोधिनी

## ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यसंस्कृतीचा पाया असलेले विशेष प्रबोधिनीपणाचे पैलू

भविष्याभिमुखता, उपासनाभिमुखता, समाजाभिमुखता, संघटनाभिमुखता, **विज्ञानाभिमुखता**

## विज्ञानाभिमुखता

कुतूहल असणे, ते शमविण्यासाठी निरीक्षण करणे, विविध घटनांमधील कार्य-कारण लक्षात येणे, त्यासाठी आवश्यक तेवढे प्रयोग करणे, निष्कर्ष मिळाले की पुन्हा प्रश्न विचारणे, म्हणजे विज्ञानाभिमुखता. असलेले विज्ञान वापरणे, नवीन संशोधन करणे, आज विज्ञानाने जे समजत नाही अशा गोष्टींशी संबंध आल्यावर आजच्या विज्ञानाच्या विरोधी न वागणे व आज विज्ञानाने न समजणाऱ्या गोष्टींची विवेकाने चिकित्सा करून त्यांचा स्वीकार करणे म्हणजे विज्ञानाभिमुखता.

## विज्ञानाभिमुखतेचे प्रबोधिनीतील आविष्कार

### ✻ विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत आधुनिकातील आधुनिक असण्याचा प्रयत्न

- १९८४ पासून संगणक व २००१ पासून जैवतंत्रज्ञान यांचे पथदर्शक अध्यापन प्रबोधिनीच्या शाळांमध्ये सुरू व २०१५ पासून बांबू उत्पादन वाढीसाठी बांबू ऊती संवर्धन (टिश्यू कल्चर)चे प्रयोग.
- केंद्रशासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागासाठी खतांचा व कीटकनाशकांचा विश्वकोश प्रकल्प
- नवनिर्मिती, समस्यापरिहार यांच्या प्रशिक्षणासाठी लेझर कटर, लेथ मशीन, थ्री-डी प्रिंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य इ. ने युक्त 'धडपड' प्रयोगशाळा, अटल धडपडालय, शिवापूर येथे कौशल्य प्रशिक्षण केंद्र इ. प्रयोगशाळा कार्यरत.
- २०२३ पासून शेती उपयोगी कवकाच्या उत्पादनासाठी 'ट्रायकोडर्मा प्रयोगशाळा' हराळी येथे सुरू.

### ✻ संशोधनाची परंपरा

- बुद्धिमंतांचे शिक्षण, प्रतिभा, वाचनवेग, सामाजिक जाणीव, वैज्ञानिक प्रतिभा, नेतृत्वगुण इ. विषयांवर मूलभूत संशोधन व त्यांच्या संवर्धनासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम.
- मानसशास्त्रीय संशोधनाच्या आधारे प्रशिक्षण कार्यक्रम व प्रशिक्षणातील अनुभवांच्या आधारे नवे संशोधन ही प्रक्रिया सातत्याने चालू.

### ✻ कार्यपद्धतीतून वैज्ञानिक दृष्टिकोनाची जपणूक

- ५० वर्षांपासून विविध प्रकारच्या प्रकल्प पद्धतींचा अभ्यासक्रमात समावेश.
- समाजामध्ये विज्ञानाभिमुखता वाढवण्यासाठी प्रकल्प शिबिरे, विज्ञान शिबिरे, विज्ञान प्रदर्शन
- विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे भारतभर आयोजन, शाळांमध्ये नित्य प्रशिक्षणे, विज्ञान स्पर्धा
- धार्मिक व शैक्षणिक संस्कारांमधील कर्मकांडाला तर्कबुद्धीच्या निकषावर आधुनिक हेतुपूर्ण रूप.
- 'भविष्यवेध' तंत्राचे शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व ज्ञान प्रबोधिनीच्या वाटचालीच्या नियोजनासाठी देखील संस्था पातळीवर देखील वापर.

### संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्रीशक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, ☎ ०२०-२४२०७००० www.jnanaprabodhini.org

# काय बोलता?

– स्वाती राजे

काय बोलतं? कोण बोलतं? कशासाठी बोलतं?
केव्हा बोलतं? त्यांना बोलायला कोण भाग पाडतं?
यांची उत्तरं शोधायची उत्सुकता वाढली ना!
वाचा तर मग ही कथा!!




गोष्ट तशी नेहमीचीच.
वर्षांमागून वर्षांची.
खूपच खूप वर्षांची.

उन्हाळा आला तसं शेतकऱ्यानं
सुरू केलं
शेतात काम.
नांगरणी-पेरणी-खुरपणी
घेतली करून.
खत-पाणी केल्यावर
पिकं आली भरून!
शेतकऱ्यानं फिरवला खुशीनं
हिरव्या पिकावरून हात!
आता हे पीक विकलं की
पैसा येणार खिशात!

शेताच्या एका कोपऱ्यात पडला
होता सुरणाचा कंद. त्याच्याकडं
शेतकऱ्याचं
लक्षही नाही गेलं.
बरेच दिवस तो कुठंतरी
अडगळीत राहिलेला पडून!
शेताच्या बांधावर
दूर दिलेला टाकून!

'दसऱ्याच्या सुमाराला
धान्य बाजारी विकू',
असं म्हणता-म्हणता
अचानकपणे आला पाऊस.
आडवा-तिडवा.
पिकं गेली वाहून.
सगळं धान्य गेलं सडून!

आता काय करायचं?
विकायचं काय...आणि
खायचं तरी काय?
आडव्या पडलेल्या शेताकडं,
वाया गेलेल्या पिकाकडे
पाहाता-पाहाता शेतकऱ्याला
आठवला
कुठंतरी कोपऱ्यात पडलेला
सुरण!
शेतकरी मनाशी म्हणाला,

'नसेना का तो दिसायला बरा!
येणार नाही त्याला
बाजारात भाव!
पण जरा काढला उपटून,
तर करता येईल त्याची
भाजी तरी चिरून!'



मग तो शोधत-शोधत
सुरणाजवळ गेला.

शेतकरी म्हणाला,
'आता हा जडच्याजड सुरण
काढावा लागणार मला
जमिनीतून उपटून वर!'
म्हणून त्याने
सुरणावरच्या वेली केल्या साफ.
आणि जमिनीत मारली कुदळ.
सुरणाभवतीची माती झाली सैल.
तेवढ्यात त्याला आवाज आला.

''कोण आहे रे तिकडं? झोपेतून
उठवतोयंस मला!
काय रे शेतकऱ्या!
वर्ष-दोन वर्ष
विचारलं पण नाहीस मला.
चांगल्या-चुंगल्या दिसणाऱ्या,
तुला भरपूर पैसे देणाऱ्या
पिकांचे केलेस लाड.
माझ्या गळ्याला
वेलींचा विळखा बसूनही,
कधी मोकळं नाही केलंस मला.
आणि आता नाईलाजानं
आलास होय
मला खणून-काढून चिरायला!
मुळीच त्रास देऊ नकोस मला!''

कोण बोलतंय ते शेतकऱ्याला
कळेचना. तो लागला इकडं-
तिकडं पाहायला.

त्याला कोणीच दिसेना! शेजारी
उभा होता,
त्याचा कुत्रा!
तोच बोलला की काय?

शेतकऱ्यानं संशयानं
कुत्र्याकडं पाहिलं.

तेवढ्यात कुत्रा म्हणाला,
''माझ्याकडं काय पाहातोयस?
मी नाही काही बोललो तुला.
तो बोलतोय जमिनीतला सुरण.
बरोबरच आहे त्याचं!
इतके दिवस त्याच्याकडं दुर्लक्ष
केलंस.
आता मोठी तुला
गरजच पडली म्हणून
उपटतोयस का त्याला?''

शेतकरी आश्चर्यानं कुत्र्याकडे
पाहू लागला.
कुत्रा म्हणाला,
''एक गोष्ट नक्की की,
तू आप्पलपोटा तर खरा!''
कुत्र्याचा शेतकऱ्याला
आला इतका राग, की
त्यानं कुत्र्याला मारायला तोडली
कडेच्या झाडाची फांदी.
ती घेऊन तो धावणार
मारायला कुत्र्याला,

तेवढ्यात झाड जोरात ओरडलं
त्याला,
''काय रे,
का मारतोयस तू कुत्र्याला?
आतापर्यंत रात्रंदिवस जागून
राखण केली, त्याने तुझी.
आज जर तो मनातलं बोलला,
तर मारतोयस होय त्याला?''

झाडही एकाएकी
बोलायला लागल्यावर

शेतकरी दचकलाच चांगला!
हातातली फांदी फेकणार
झाडाखालच्या दगडावर...

तेवढ्यात दगड ओरडला त्याला,
''का फेकतोयस फांदीला? इतके
दिवस सावली दिली
झाडाने तुला..
त्याची फळं खाल्लीस
पोट भरायला,
आणि आता तोडलंस त्याच्याच
फांदीला?
तुझ्या हाता-पायाला
कोणी दुखावलं तर
चालेल का रे तुला?''

आता मात्र शेतकऱ्याची भीतीने
गाळणच उडाली.
तो इतका घाबरला,
की तो तसाच लागला पळायला.
पळता-पळता शेताबाहेर आला..
रस्त्यावरून चालली होती
एक बैलगाडी.

गाडीवानाने विचारलं,
''काय रे शेतकरीदादा, पळतोस
कशाला?''
शेतकऱ्यानं सारं सांगितलं
गाडीवानाला आणि म्हणाला,
''काय सांगू मित्रा!
मी उपटत होतो सुरण.
चिरून भाजी बनवायला,
तर एकाएकी तोच लागला
बोलायला.

**यापुढील कथा मूळ दिवाळी अंकात वाचा**



पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त : वैजयंतीमाला (२०२४, तमिळनाडू),
यांच्या कला आणि नृत्यातील योगदानासाठी...

वार्षिक देणगीदार - • सौ. किरण मुसळे, सांगली • श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे
• वाचस्पती सौ. वैशाली पाटील- देवरे, शिरपूर, जि. धुळे

# गे मायमराठी

तू दिलास मजला व्यक्ताचा आनंद
वाजली अक्षरे नाद-लयीचा छंद... ।।

उमटले शब्द मग अर्थ बांधुनी पायी
सन्मान प्रतिष्ठा वाजत गाजत येई ।।

हे हृदय मोकळे करताना भरलेले
तू दिलीस शक्ती मौन बोलके झाले ।।

मग सुख-दु:खाच्या लडी किती गुंफून
अन् अभिमानाच्या शुभ्र कळ्या मांडून ।।

सजवून ठेविल्या मधुराशी आशेच्या
लपविल्यात रात्री असह तीव्र घावांच्या ।।

हे माय मराठी कृतज्ञता स्वीकारी
गाभारा उजळे तेज तुझे अंधारी ।।

गाईन कीर्ति मी तुझ्या दिगंत यशाची
आजन्म शपथ तव संजीवक चरणांची...।।



**- संजीवनी बोकील**,ए ४/७०३ आदित्य शगुन,
पाषाण रस्ता, बावधन, पुणे 411021, **चित्रकार : सायली कुलकर्णी**

**नक्की ऐका**
**कविता :** काळीज संत जनांचे
**कवयित्री :** संजीवनी बोकील
**वाचनस्वर :** मृणालिनी कानिटकर-जोशी

# दीपावली



दिव्यांची आरास
शोभते घरास
अंधाराचा ऱ्हास
दीपावली ।।

पहाट फुलते
श्वासात खुलते
मनात झुलते
दीपावली ।।

चैतन्यात न्हाते
आनंदात गाते
प्रेमालागी नाते
दीपावली ।।

प्रसन्न पणती
शकुन जाणती
सौख्यात गणती
दीपावली ।।

**- मुबारक शेख**
ब्लॉक नं ७ अ, मुलकी नोकर हौसिंग सोसायटी,
सिद्धेश्वर नगर, भारती विद्यापीठासमोर, विजापूर रोड,
सोलापूर - 413004
**चित्रकार : चित्रांजली**

माहितीपर

# अवकाश स्थानकावर राहायचं आहे?

– मेघश्री दळवी



अलीकडेच भारताचे 'शुभांशू शुक्ला' *ॲक्झिअम* मोहिमेतून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर जाऊन आले. तुम्ही बातम्यांमध्ये पाहिलंच असेल. तिथून पृथ्वी फार सुंदर दिसते, एका दिवसात सोळा वेळा सूर्योदय पाहायला मिळतो, अशा गमतीजमती वाचल्याही असतील. मग आपणही तिथं जावं, असं तुम्हालाही वाटत असेल ना? चला तर, आज आपण अवकाश स्थानकावर जाऊन राहताना, काय-काय मजेशीर अनुभव येत असतील त्याची झलक पाहू या.

अवकाश स्थानकावरचं सर्वात अनोखं आकर्षण म्हणजे स्थानकाच्या खिडकीतून दिसणारा पृथ्वीचा निळाशार गोल. काळ्याभोर अवकाशाच्या पार्श्वभूमीवर तो अतिशय उठून दिसतो. स्थानकातून तुम्ही एकाच वेळी आपला संपूर्ण भारत देश पाहू शकाल. हिमालय, सह्याद्रीच्या रांगा, अनेक नद्या आणि रात्री चमकणारी शहरं सारं डोळ्यात साठवून घेऊ शकाल. सूर्योदय, सूर्यास्त, ढग-पाऊस, वीज चमकणं हे अवकाशातून पाहाणं फार थरारक असतं, ते क्षण तुम्हाला टिपून घेता येतील. अवकाश स्थानक पृथ्वीभोवती साधारण दीड तासांत एक फेरी पूर्ण करतं. त्यामुळे एका दिवसात ते सोळा वेळा पृथ्वीभोवती फिरतं. तिथे दर दिवशी सोळा सूर्योदय आणि सोळा सूर्यास्त असं विलक्षण दृश्य पाहण्याची संधी तुम्हाला मिळेल.

पृथ्वीवर राहताना आपण सकाळी उठतो, नाश्ता करतो, अंघोळ करतो, आणि तयार होऊन शाळेला जातो. हे सगळं आपल्याला इतकं सवयीचं झालं आहे की, त्यात वेगळं काही वाटत नाही. पण तुम्ही अवकाश स्थानकावर रहात असाल तर या सवयी अशाच ठेवता येतील का? बघायचं का आपण?

**यापुढील माहितीपर लेख मूळ दिवाळी अंकात वाचा**




# दिव्याच्या थेंबभर उजेडात मी कवी झालो

**– ऐश्वर्य पाटेकर**

**श**ब्दाला शब्द टाचत मी लिहू लागलो कविता. असं करता–करता एक अख्खी कवितेची वहीच भरून टाकली. म्हणजे मला वेडच लागलं कविता लिहिण्याचं.

झालं असं की, सहाव्या इयत्तेत शिकत असताना एक दिवस पवार सर वर्गात आले. ''मुलांनो, तुमच्यासाठी खूशखबर आहे!'' सर म्हणाले.

''आपल्या शाळेचं 'प्रेरणा' नावाचं हस्तलिखित आपण काढणार आहोत. त्यात कविता, कथा, लेख, निबंध प्रसिद्ध होतील. तेव्हा तुम्ही त्यात लिहायचं आहे. मात्र, तुम्ही जे लिहाल, ते स्वरचित असलं पाहिजे. कशातनं उतरून घेतलेलं नसावं.''

अशी सूचना देऊन पवारसर निघूनही गेले. त्यांनी दिलेली सूचनाही माझ्या डोक्यावरून गेली. काहीच उमज झाला नाही. माझ्या शेजारी बसणारा 'स्वानंद' खूप हुशार होता आणि माझा दोस्तही! त्याला मी विचारलं,

''काय रे स्वानंद, कशाचं हस्तलिखित म्हणताहेत सर?''

''अरे, तू माझ्याकडून छोटा दोस्त, चंपक, चांदोबा ही मासिकं वाचायला नेतोस की नाही, तसंच असणारे. ते छापलेलं असतं; हे हाताने लिहिलेलं, म्हणून हस्तलिखित!''

''मग मी पण लिहीन कविता,'' मी उत्साहाने म्हणालो.

नाहीतरी मी काहीबाही बडबडत माझ्या बहिणींचं डोकं उठवत होतोच. रात्रीचाच बसलो कविता लिहायला. घासलेटच्या दिव्यात जेमतेम घासलेट! सारेच झोपी गेले होते. वहीवर गिरवत बसलो कवितेची बाराखडी. ज्या वयात पाढे तोंडपाठ म्हणायचे,



गणिताची सूत्रं ध्यानात ठेवायची, इतिहास भूगोलात रमायचं, ते सोडून कवितेच्या हिरव्या फांदीला लोंबकळून मी हिंदोळे घ्यायला लागलो. आईची चुळबुळ जाणवली. मी पाणी प्यायला स्वयंपाक खोलीत गेलो, तर तिथं अंधारगुडूप. काही दिसलं नाही. थेट तांब्यालाच ठोकर लागली. तांब्या घरंगळत मोरीच्या भिंतीवर आदळला अन् चांगलाच कानठळ्या बसावा असा आवाज झाला. काम करून थकलेली आई चिडली. तिची झोपमोड झाली.

''काय रे भावड्याऽऽ काय खुडबुड करून राहिला? घ्यायचं झोपून, तर राहिला डोळे फोडून!''

''आई, 'कविता' लिहितोय मी!''

''अरे, त्या दिव्यात घासलेट कमीये. घे झोपून! सकाळी लिही तुला काय लिहायचं ते!''

''शाळेत कसं लिहिता येईल आई?''

**यापुढील ललित लेख मूळ दिवाळी अंकात वाचा**



वार्षिक देणगीदार – • गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे • श्री हृषीकेश देशमुख, पुणे • डॉ. संतोष काकडे, पुणे • डॉ. स्वप्नील कर्णे, पुणे



# विचित्र मोहीम

– भारत सासणे

‘साडेअकरा वाजता मला ‘तिकडं’ जाऊन लपायचं आहे, आमच्या *प्लॅनप्रमाणे*. तेव्हाच मी दोन विचित्र गोष्टी पाहिल्या. मी वर जाणाऱ्या जिन्यावर डॉ. गरुडांना पाहिलं. ते हळूहळू पायऱ्या चढत होते. मी दचकलो. डॉ. गरुड तिकडं काय करताहेत? आणि एकटे? की मला काही भास झाला अंधूक प्रकाशात?’

…यावेळी कोणत्या ‘एक्सायटिंग केस’ साठी डॉ. गरुडांनी राम आणि श्यामला अचानक बोलवून घेतलं? वाचू या सोबतच्या उत्कंठावर्धक कथेतून…

**श्या**मची पद्धत तुम्हाला तर माहीत आहेच. तो गोपनीयता बाळगतो. तो सगळं मलाही सांगतोच असं नाही. त्याचं ते सगळं ‘बुद्धिनिष्ठ, *लॉजिकल* – तर्कसंगत’ असं चाललेलं असतं. आणि माझं व्यायाम, कराटेची *प्रॅक्टिस* असं चाललेलं असतं, तर या वेळेला आम्ही अगदी वेगळ्या मोहिमेत ओढलो गेलो.

झालं असं की, डॉ. गरुडांनी श्यामला आणि मला अचानक बोलावून घेतलं. गेलो तर खिडक्या – दारं बंद करून कडेकोट बंदोबस्त केलेला दिसला. आम्हाला पाहून त्यांनी आम्हाला पटकन आतल्या *लॅबोरेटरीमध्ये* नेलं.

‘‘राम आणि श्याम, तुम्ही दोघं आलात ते बरं झालं… फारच *एक्सायटिंग केस* आहे.’’

‘‘काय झालं? काय प्रकरण आहे?’’

‘‘ही *फाईल* बघा.’’

त्यांनी पेपरच्या कात्रणांची *फाईल* आमच्या हातात दिली. आम्ही वाचू लागलो. बातमी अशी होती की, ऽ कोलंबिया नावाच्या देशात



छात्र प्रबोधन
४०० वा अंक
शुभ दीपावली
सिद्धी गॅस एजन्सी
भारत गॅसचे पिंपरी परिसरासाठी वितरक
पत्ता : प्लॉट नं. एच्-पी-१, एच् ब्लॉक, एम.आय.डी.सी., पिंपरी, पुणे ४११०१८
दूरभाष : ०२०-२७४८५९६०.
Bharat Petroleum

आकाशात उडणारी गोलाकार अशी विचित्र वस्तू नुसती आढळून आली नाही, तर ती खाली पडल्यामुळं ताब्यातसुद्धा घेण्यात आली आहे. वस्तू गोलाकार, फुटबॉलसारखी आहे. त्यावर विचित्र अक्षरं किंवा चिन्हं कोरलेली आहेत. संशोधक त्या वस्तूचा अभ्यास करीत आहेत. ती वस्तू ज्या धातूपासून बनवली, तो धातू या पृथ्वीवरचा नाहीच, निदान नसावा. यातून मधूनमधून प्रकाश बाहेर पडतो. हा परग्रहवासियांनी पाठवलेला *कॅमेरा* असेल किंवा *व्हॉइस रेकॉर्डर*. ही अज्ञात वस्तू मानवाच्या ताब्यात असून संशोधन व अभ्यास सुरू आहे.'

आम्ही अवाक् झालो. आम्ही *फोटोकडं* बघत राहिलो. एका *सायंटिस्टने* हातात तो गोल तोलला आहे. दुसऱ्या फोटोत त्यावरची चिन्हं दिसताहेत. तिसऱ्या फोटोत *'एक्स-रे इमेज'* दिसत आहे. मी अगदी अधीर झालो, *एक्साइट* होऊन उभाच राहिलो. मी जवळपास ओरडलोच,

''म्हणजे ऽ.... आपण...''

''येस्! आपण जाणार आहोत... आपण तिघे...''

आणि मी नाचायलाच लागलो.

**२. मोहीम!**

मी म्हटलं, ''म्हणजे आपण कोलंबियाला जाणार?''

''*अन्फॉर्च्युनेटली नोऽ. सॉरी टू डिसअपॉइंट.*' मी एकदम खाली बसलो. त्यांनी अगदी हलक्या आवाजात सांगायला सुरुवात केली.

''राजस्थानच्या वाळवंटात याच प्रकारच्या वस्तू आकाशात उडताना दिसत आहेत. भारत सरकार अत्यंत गुप्तपणे त्याबाबत संशोधन करीत आहे. या वस्तू किंवा हे गोल अजून पकडता आलेले नाहीत. मात्र कोलंबिया देशात जी वस्तू सापडली आहे, तसेच हे पण आहेत, म्हणून कोलंबियन *यु.एफ.ओ.* अत्यंत गुप्तपणे *इंडियात* आणलंय.''

'''राजस्थानात? कोलंबियन सरकारकडून?''

*''नो ऽ यंग मॅन!''*

ते पुन्हा हलक्या आवाजात सांगू लागले, ''त्यांचं म्हणणं असं की, उडणारी वस्तू *'कोलंबिया रीसर्च सेंटर'* नावाच्या संस्थेकडे आहे. या संस्थेकडूनच ती वस्तू आणली गेली आहे. पण सरकारी देखरेख आहेच.''

''मग?''

''मग काय? मला बोलावलं आहे... आपण जाणार आहोत... आणि मी *ओके* म्हटलं की...''




**यापुढील कथा मूळ दिवाळी अंकात वाचा**

# मोहीम रूपकुंड

- अवधूत गुरव




**४२ किमीचा, ५ दिवसांत, १६ हजार फुटांची उंची गाठत हिमालयातल्या रूपकुंडचा केलेला साहसी ट्रेक!**

**अनेक शारीरिक, मानसिक आव्हानांना भिडत, निसर्गातील संकटांचा सामना करत पूर्ण केलेल्या ट्रेक चा थरार अनुभवायचाय? मग वाचा हा लेख!**

'रूपकुंड'... सहज आपण *गुगल सर्च इंजिनमध्ये* टाकलं, तर विविध प्रकारची माहिती क्षणर्धात आपल्या समोर येते. ही चित्तथरारक माहिती पाहून हा ट्रेक करण्याची खूप तीव्र इच्छा निर्माण झाली. डोक्यात तसं नियोजन सुरू झालं. स्थानिक संपर्क मिळाला आणि तपशीलवार माहिती घेऊन, प्रत्यक्ष नियोजन आणि तयारी सुरू केली. अजून कुणी येण्यास इच्छुक आहे का, अशी विचारणा मित्रमंडळींना केली आणि साधारण १५ जणांचा गट तयार झाला. तारीख ठरली १५ मे ते २५ मे, २०२५!

किमान २ महिन्यांपासून नियमित सराव, रेल्वे बुकिंग, आवश्यक साहित्याची जमवा-जमव इत्यादी सोपस्कार करून १५ मे २०२५ रोजी पुणे स्टेशनवरून आम्ही आमच्या प्रवासाला सुरुवात केली. दोन दिवसांचा प्रदीर्घ प्रवास करून आमच्या *बेस कॅम्प* 'वान' या ठिकाणी पोहोचलो.

'वान' हे उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील शेवटचं गाव. डांबरी रस्ता इथं येऊन संपतो. अगदी टोकाचं गाव असल्यानं मानवी हस्तक्षेप जास्त नाही.

**यापुढील लेख**
**मूळ दिवाळी अंकात वाचा**



# युद्ध : सैनिकांचे आणि नागरिकांचे

- अजित कानिटकर

> **कोणतंही युद्ध हा प्रत्येक देशासमोरचा सर्वात शेवटचा पर्याय असतो. याचा अर्थ असा नाही की, कोणताही अन्याय निमूटपणे स्वीकारायचा!**

पहलगाम मध्ये अतिरेक्यांनी निरपराध व निःशस्त्र अशा आपल्या देशातील नागरिकांची हत्या केल्यानंतर सर्व देशभर संतापाची लाट उसळली. भ्याड मनोवृत्तीच्या अतिरेक्यांना पाठीशी घालणाऱ्या आपल्या शेजारी देशाला कायम लक्षात राहील, असा धडा शिकवण्यासाठी; आपल्या सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने अतिशय सुनियोजित अशी आक्रमक मोहीम आखली. जितक्या तपशिलात नियोजन केलं; तसंच अचूक व वेगवान अशा कार्यवाहीने ५-६ दिवसांत ही मोहीम फत्तेही केली. 'छात्र प्रबोधन'च्या सर्व कुमार वाचकांना 'अनुभवायला' मिळालेली ही पहिलीच लढाई असेल. पण यापूर्वीही १९४८-१९६२-१९६५-१९७१ मध्ये आपल्या देशानं लढाया पाहिल्या आहेत. आपल्या सैनिकांनी सजगपणे आपलं रक्षण केलं आहे. 'कारगील' लढाई व 'विजय दिवस' याला यंदा २६ वर्षे पूर्ण झाली.

'ऑपरेशन सिंदूर'ची लढाई तुम्ही-आम्ही 'अनुभवली' म्हणजे काय केलं? आपण शांतपणे बंद-सुरक्षित घरात राहून, वर्तमानपत्रातील मथळे, *यू-ट्यूबवरील व्हिडिओ* आणि दूरचित्रवाणीसंचावरील आवेशपूर्ण बातम्या 'पाहात' होतो. या 'दृश्य' लढाईत आपल्या अंगावर एक ओरखडाही उठला नव्हता. आणि दुसरीकडे पंजाबात तुमच्यासारखाच फिरोजपूरचा, दहा वर्षाचा एक मुलगा श्रवणसिंग लढाईच्या काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून, सीमेवर कामगिरी करणाऱ्या आपल्या सैन्याला गार पाणी-जेवण-चहा-लस्सी दिवसभर नेऊन देत होता!

'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात सर्व देशभर चैतन्याचं वातावरण होतं. देशभक्तीपर घोषणा-गाणी सतत ऐकू येत होती. हे युद्ध संपल्यावर मात्र तोच आवेश, तितकंच देशप्रेम, राष्ट्रभक्तीची भावना तुमच्या आमच्यात राहिली आहे का?

**यापुढील लेख मूळ दिवाळी अंकात वाचा**

छात्र प्रबोधन ४०० वा अंक

नजरेच्या आकाशदिव्यांनी, हिमशिखरे उजळवली तुम्ही।
रणगाड्यांच्या रांगोळ्यांनी, वाळवंट सजविले तुम्ही ।।

शुभेच्छुक - • डॉ. रवींद्र सेठिया, पुणे • सौ. नीलिमा राजेंद्र सेठिया, पुणे
• श्री. अरविंद दीक्षित, पुणे • अमेय फ्लुईड कंट्रोल सिस्टीम्स् प्रा. लि., पुणे




# दिवाकर

कुण्या दिव्याचा रंग उडाला नसे पुराना थाट
कुण्या दिव्यावर असे काजळी काळी काळी दाट
कुण्या दिव्याची बुडून गेली तेलामध्ये वात
कुण्या दिव्याच्या मातीमध्ये तेल झिरपले आत ।।१।।

कुणी दिवा हा असे एकटा बसून मागे फार
कुण्या दिव्याच्या नसे नशिबी दिंडीचेही दार
कुण्या दिव्याला उमजत नाही रात्रीचा तो डाव
कुण्या दिव्याला ठाऊक नाही सूर्याचा तो गाव ।।२।।

कुणी दिवा पण छाती काढून उभा राहिला ताठ
अंधाराला चिरून त्याने दिशा उजळल्या आठ
म्हणे थोपविन क्षणात एका प्रचंड मोठी लाट
असे एकटा, परी अडवेन काळोखाची वाट ।।३।।

कुणी नसेना माझ्या सोबत चालत राहीन तरी
रडणे बिडणे, विझणे बिझणे ठाऊक नाही परी
वाऱ्यालाही जुमानले ना, वादळास ना क्षमा
पेटून उठला, उठून लढला, लढून जिंकले तमा ।।४।।

कुण्या दिव्याच्या ओठी आता 'त्या' दिव्याची वाणी
कुणी दिवा अन् गातो आता 'त्या' दिव्याची गाणी
कुणी कुणी अन् किती किती या जागृत झाल्या वाती
रोज नव्याने पेटून उठती लाखो इथल्या ज्योती ।।५।।

दिव्यादिव्याने पेटत जाते अखंड एकच माला
दिव्यादिव्यातून उभी राहते प्रचंड एकच ज्वाला
दिवा - दिवा हा त्या तेजाची कथा मिरवतो भाळी
दिव्यादिव्यांची आणिक होते तेजोमय दिवाळी!।।६।।

**- श्रेयश फापाळे**
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 30
**चित्रकार : गिरीश सहस्त्रबुद्धे**



SANTOOL
HAPPY DIWALI
We specialize in providing manufacturing services where functional and process challenges are evident. We mainly cater to the customers needing high precision. We are committed to achieving higher quality standards in manufacture and supply of engineering items/ components/ equipment as per customers' drawings and specifications by employing appropriate technology, ensuring customers' satisfaction every time in manufacturing of components, sub-assemblies / assemblies often involving special processes.
211/4, Navi Peth, Pune - 411 030. www.santool.co.in

# माझी बंडखोरी

सामान्यतः घरी-दारी, शाळेत तुम्हाला सर्वजण शिस्तीने, नियमाप्रमाणे वागा, मोठ्यांचं ऐका, रीतीरिवाज पाळा अशा प्रकारचे उपदेश कळत-नकळत देत असतात. अशा वातावरणात आम्ही मात्र तुम्हाला 'बंडखोर व्हा!' असं आवाहन करतो, याचं आश्चर्य वाटलं ना...!

त्याला एक कारण आहे. ते म्हणजे 'बंडखोरी' ही नेहमीच वाईट असते असं नाही. बरेच वेळेला ती 'विधायक' गोष्टींसाठी, अन्याय दूर करण्यासाठी केलेली असते. बंडखोरी म्हणजे विरोधासाठी विरोध करणे नव्हे !

बंडखोरी म्हणजे मुद्दाम, हट्टीपणाने न ऐकण्याची वृत्ती नव्हे..!!

'बंडखोरी' ही काही वेळा उत्स्फूर्तपणे केलेली असते, तर काही वेळा ती संयत विचारातून केलेली असते. वेळोवेळी विविध क्रांतिकारकांनी/ समाजसुधारकांनी केलेलं बंड हे देशात, समाजात फार मोठा बदल घडवण्यासाठी केलेलं होतं, तर तुमच्या आमच्यातल्या सामान्यातल्या असामान्यांनी अगदी लहानपणापासून लहान-सहान गोष्टींसाठी विरोध दाखवून केलेली एखादी चांगली गोष्ट, हीसुद्धा 'बंड'च ठरतं!

असं बंड करण्यासाठी सारासार विचार करण्याची बुद्धी लागते, प्रसंगी निर्भयपणे आपलं मत व्यक्त करण्याचं धाडस लागतं. आपले विचार कृतीत आणण्याची धमक लागते. कधी एकट्याने, तर कधी आपल्या सहकाऱ्यांमध्ये त्या विचारांचं स्फुल्लिंग चेतवून विधायक कामासाठी संघटित कृती करावी लागते. अशाप्रकारे आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर विधायक बंड केलेल्या विविध क्षेत्रांतील ३ कर्तृत्ववान व्यक्तींचे रोमांचकारी अनुभव या लेखमालिकेत जाणून घेणार आहोत.

शेती ते उद्योग व सामाजिक कार्य या विविध क्षेत्रांत 'सीमंतिनी खोत' यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. त्यांच्यामध्ये अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी लागणारी बंडखोरी ठळकपणे दिसून येते. विधायक काम पूर्ण करण्यासाठी अन्यायाला प्रतिकार करताना, लागणाऱ्या चिवट लढाऊवृत्तीचं दर्शन त्यांच्या लेखातून होतं.

महसूल खात्यात प्रशासकीय अधिकारी असलेले 'आबा महाजन' यांचे व्यक्तिमत्त्व वरवर पाहता शांत दिसणारे; पण चुकीच्या गोष्टींविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा त्यांच्या अंत:करणात लहान वयापासून होती. तसंच अपयशावर मात करण्यासाठी, प्रसंगी स्वतःशीही बंड करावं लागतं, असा अनोखा विचार ते आपल्या लेखात मांडतात.

शालेय वयापासून गांधीजींच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या 'सुधाताई कोठारी' यांचे आयुष्य म्हणजे प्रतिकूल सामाजिक परिस्थितीला ठामपणे तोंड देऊन, प्रसंगी समाजाचा विरोध पत्करून, त्यांनी दीर्घकाळ बंडखोरी केली. त्याचं फलित म्हणून स्त्रियांसाठी एक सामाजिक चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली. बचत गटांच्या माध्यमातून अनेक स्त्रियांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू झाली.

या तीनही व्यक्ती वेगवेगळ्या पिढीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या! त्यामुळे या कथा वाचताना एक गोष्ट लक्षात येते, की काळ कोणताही असो अशा 'बंडखोर' व्यक्तींमुळेच समाज गतिशील राहून, विधायकतेकडे प्रवास करत असतो.

या तिघांच्या बंडखोरीच्या कथा वाचून तुमच्या रोजच्या आयुष्यात जिथे जिथे असे विधायक बंडखोरीचे क्षण येतील, तेव्हा नीडरपणे निर्णय घेण्याची प्रेरणा तुम्हाला नक्की मिळेल. शेवटी सुधीर मोघे यांनी म्हटल्याप्रमाणे 'बंड' म्हणजे 'अविचार' नव्हे, क्षणिक वेडेपणा नव्हे, तर विधायक कामासाठी चुकीच्या गोष्टींना विरोध करण्यास लागणाऱ्या निर्भयतेचा हुंकार!

*बंड नव्हे हे वेडे, नव्हता केवळ अविचार!*
*स्वातंत्र्याच्या सुषुप्तीतला पहिला हुंकार!!*

– सुधीर मोघे

**अवश्य वाचा**
**लेख –** संघर्षातून विधायक कार्याकडे
**लेखक –** डॉ. भीमराव गस्ती

ध्येय असावे सुदूर की, जे कधी न हाती यावे।
जीवे भावे मात्र तयाच्या, प्रकाशात चालावे।।

वार्षिक देणगीदार - • श्री. ओंकार चांदोरकर, नाशिक • सौ. चारुशीला व श्री. शरद केशव आवटे, पुणे • श्री. अजित दातार, पुणे • श्री. शंतनू पटवर्धन, पुणे



# ‘का’ची उत्तरं शोधताना...

– सीमंतिनी खोत

• व्यवसायाने शेतकरी • संयुक्त राष्ट्र अन्न व कृषी संघटना (FAO/UN) मध्ये वरिष्ठ मूल्यांकन तज्ज्ञ म्हणून काम केले. • सुझलान एनर्जी कंपनी मध्ये संचालक • अनेक ग्रामीण कृषी संस्थांशी संलग्न, अनेक संचालक मंडळांवर कार्यरत • शाश्वत विकासासाठी मार्गदर्शन!

‘बंडखोर’ हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या डोळ्यांपुढं उभा राहतो, एक पेटलेला, विरोधाच्या झेंड्याखाली तावातावाने ओरडणारा तरुण; पण माझ्या दृष्टीनं ‘बंडखोरी’ ही बाहेरून गोंगाटी वाटली, तरी ती चुकीच्या गोष्टींविरुद्ध उभं राहण्याच्या धाडसात असते!

आपल्या आजूबाजूला घडणारी एखादी गोष्ट आवडली नाही, तर तुमची कधी चिडचिड होते का? ‘असं का’, ‘असं नाही केलं’ किंवा ‘नाही झालं’ तर काय होईल?? असे प्रश्न तुम्हाला पडतात का? असं असेल, तर त्यात काहीच वावगं नाही. बऱ्याच मुलामुलींना असे प्रश्न पडत असतात. उदाहरणार्थ मुलींचं लग्नाचं वय १८ आणि मुलांचं मात्र २१ वर्षे, असं का? शाळेत संगीताला गणितापेक्षा कमी महत्त्व का?? आईच का रोज स्वयंपाक करते? वगैरे. अशा गोष्टींना शब्दांतून, कृतीतून आपण सातत्यानं विरोध करू लागलो, तर आपल्याला ‘बंडखोर’ म्हणू लागतात. सांगेल तसं, मुकाट्यानं न ऐकल्यानं शिस्तभंग का होतो? आपण गप्प बसत नाही; म्हणून आपली कटकट का वाटते?

आज मागे वळून पाहताना वाटतं, माझ्या आयुष्यात अशी बंडखोरी करण्याचे मला अनेक फायदे झाले; कारण माझ्या विरोधाला विधायक वळण देणारे, घरादारात दोन्हीकडं भेटले.

माझे वडील महाराष्ट्र शेती महामंडळात होते. दर सहा महिन्यांनी आमची बदली होत असे. वेगवेगळ्या ठिकाणी माझे शिक्षण झाले.

शाळेत शिकत असल्यापासून वडिलांनी आम्हाला स्वतंत्र विचार करून शिकण्याची सवय नकळत लावली होती. मी पुढे इ. १०वी-११वीत असताना विद्यार्थी संघटनेमार्फत आम्ही फलटणच्या माकडमाळ वस्तीतील पारधी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचं काम करत होतो. मुलं बऱ्याचदा उपाशी, आंघोळ न केलेली, अंगावर धड कपडे नाहीत अशा अवस्थेत असत. आम्ही त्यांचे खेळ घेणं, खाऊ देणं, स्वच्छतेची सवय लावणं आणि जन्मदाखले करून शाळेची नोंदणी करणं या प्रयत्नात होतो. तेव्हा जाणवलं की, मुलांची ही अवस्था, त्यांच्या आई-वडिलांना कोणताही रोजगार नाही यामुळे आहे. त्यांना जर पैसे मिळाले, तर ते मुलांना खाऊ पिऊ घालतील. त्यांच्या आया कधी-कधी माळरानावरचा, *कॅनोलच्या* पाण्यावरचा चारा विकून ५-१० रुपये मिळवत.

यापुढील लेख
मूळ दिवाळी अंकात वाचा



भारतरत्न पुरस्कार प्राप्त : डॉ. एम.एस. स्वामीनाथन (२०२४, तमिळनाडू),
भारतातील ‘हरित क्रांतीचे जनक’. गहू आणि तांदळाच्या उच्च उत्पन्न देणाऱ्या वाणांच्या विकासाचे नेतृत्व

वार्षिक देणगीदार - • सौ. प्रियतमा सिसोदिया, धुळे • श्री. आदित्य करंदीकर, पुणे • श्री. दिनेश सोनसळे, पुणे • श्री. राहुल पाटील, पुणे

आणि तर्कशैली यामुळं मी कोणाचं ऐकलं नाही. पुढे *आर्ट्स* घेऊनही मला उत्तम *करिअर* करता आलं. पण आज मागे वळून पाहताना नक्कीच वाटतं. विज्ञानशाखेला गेले असते, तर शेती, पाणी, पर्यावरण, आर्थिक व्यवस्थापन या सर्व विषयांसाठी अधिक चांगली बैठक तयार झाली असती. म्हणून आज मी विद्यार्थ्यांना सांगू इच्छिते की, विरोध करताना, रूढीपेक्षा वेगळा निर्णय घेताना, 'भावना' आणि 'विचार' दोन्ही महत्त्वाचे!

**सहानुभूती, तर्क, भावना आणि विचार यांचा समतोल साधून केलेली कृती म्हणजे खरी बंडखोरी. बंडखोर व्हा, पण बिनधास्त नव्हे. विवेकी बंडखोर व्हा!** समाजाशी संवाद साधून बंडखोर व्हा; कारण 'का' विचारणाऱ्यांमुळेच नवीन मार्ग तयार होतात.

आज मागे वळून पाहताना लक्षात येतं की, ही बंडखोरी म्हणजे माझं वैचारिक बीज होतं. जे मी काळाच्या प्रवाहात सतत जपलं, जोडलं आणि जोपासलं. या प्रवासातून मला जे शिकायला मिळालं, ते शाळेतील पुस्तकांमध्ये नव्हतं, ते शिकवलं बंडखोरीनं. मी जेव्हा-जेव्हा 'हे बदलायला हवं!' म्हटलं, तेव्हा माझ्यात काहीतरी रुजत गेलं; मूल्य, नेतृत्व, जबाबदारी आणि प्रश्न विचारायची हिंमत! आवाज उठवताना संयम ठेवणं, विविध दृष्टिकोन समजून घेणं हीच खरी 'समजूतदार बंडखोरी' आहे.

मला ज्या जबाबदाऱ्या आणि संधी मिळाल्या, त्या केवळ पदव्या आणि गुणांमुळे नव्हे; तर, मी वेळोवेळी 'हो' म्हणण्याऐवजी 'का?' विचारलं म्हणून! सुसंस्कारांच्या नावाखाली निःसंशय शरण न जाता, प्रश्न उभे केले म्हणून! आणि त्यापेक्षा महत्त्वाचं 'का'ची उत्तरं शोधायचा प्रयत्न केला म्हणून!!


**- सीमंतिनी खोत**
seema.khot@gmail.com


---



## 'मन'भर आनंद देणारी बंडखोरी!

**- आबा महाजन**

लोक असं म्हणतात की, मी मितभाषी आणि शांत स्वभावाचा आहे. पण कोणावर अन्याय होत असेल तर मी गप्प बसू शकत नाही. याचा प्रत्यय अगदी लहानपणीच्या एका प्रसंगातून दिसतो.

साधारण मी चौथ्या-पाचव्या इयत्तेत असेन. एकदा मी लग्नासाठी एस.टी.ने गावी जात होतो. सोबत घरातील वडीलधारी मंडळी होती. शेवटी एकदाची बस आली आणि गर्दीमधून आम्ही कसेबसे बसमध्ये चढलो. उन्हाळ्याचे दिवस. उभं राहणं देखील कठीण होतं, इतकी खचाखच भरलेली बस! बसमध्ये काही *सीट* महिलांसाठी राखीव असतात. त्या जागेवर देखील पुरुष मंडळींनी जागा बळकावली होती. अनेक म्हातारे


**यापुढील लेख**
**मूळ दिवाळी अंकात वाचा**





**भेट द्या : कैलास मंदिर (महाराष्ट्र)** - सुमारे १२५० वर्षांपूर्वीचे हे वेरूळ येथील शंकराचे मंदिर एकसंध खडकात द्रविड शैलीत कोरण्यात आलं, जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित.

शुभेच्छुक - • श्री. पराग हजिरनीस, पुणे • श्री. अनिरुद्ध जोगळेकर, पुणे



# हजारोंच्या आयुष्यात बदल घडवणारी कथा

- सुधा कोठारी

• 'चैतन्य' या NGO च्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त • एकल महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी, सक्षमीकरणासाठी काम • 'आंध्र प्रदेश महिला अभिवृद्धी सोसायटी'च्या संचालक मंडळावर कार्यरत • 'अफार्म', संथेच्या संचालक मंडळावर कार्यरत • युवक नेतृत्व शिबिरे, दुष्काळ निवारण कार्यांमध्ये सक्रिय सहभाग

लेखाच्या निमित्ताने विचार करते की, कोणत्या कोणत्या कृती मी केल्या ज्याला 'बंडखोरी' म्हणता येईल?

शाळेत असताना सातवी-आठवीत महात्मा गांधी यांचे 'सत्याचे प्रयोग' पुस्तक वाचलं होतं. 'सत्या'मध्ये इतकी ताकद आहे, तर आपणही प्रयोग करून पाहू या, असा विचार मनात आला.

शाळेला मी बसने जायचे. एकदा बस वाटेतच नादुरुस्त झाली आणि त्यामुळे शाळेत उशिरा पोहोचले. वर्गात गेल्यावर वर्गशिक्षकांनी सांगितले, ''उशिरा आलीस, वर्गाबाहेर उभी रहा.''

मी त्यांना शांतपणे सांगितलं,

''माझा दोष नव्हता, बसच नादुरुस्त झाली होती.'' तरीही मला शिक्षा झाली; कारण 'वेळेवर न पोहोचणं' चूक मानली गेली; पण माझ्या मनात खरं बोलल्याचं समाधान मात्र होतं.

ज्याकाळी मुली एकट्या, बाहेर फारशा निघत नसत, त्या वेळची गोष्ट! वेगवेगळ्या शाळांनी मिळून एक निधी संकलनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. १९७१ साली बांगलादेश युद्धामुळे आलेल्या स्थलांतरित लोकांसाठी, तो निधी गोळा करायचा होता. त्यासाठी १२ किमी ची पायपीट करायची होती. आयुष्यात पहिल्यांदाच मी इतकं चालले. आमच्या शाळेतून निधी संकलनासाठी कोणी बाहेर पडायला तयार होत नव्हतं; पण मी एकटीने चालत जाऊन निधी गोळा करण्याची बंडखोरी केली.

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य विद्यालयात शिकत असताना महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये नियमित सहभाग घेतला. व्यक्तिमत्त्व विकास मंडळ, कॉमर्स असोसिएशन, वार्तापत्र, इंटर कॉलेज स्पोर्ट्स प्रतिनिधी असे अनेक अनुभव तिथे मिळाले.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षात 'वर्ग-प्रतिनिधी' म्हणून उभं राहण्याचा आग्रह वर्गातील मुलींनी केला. तेव्हा वर्गात शंभर विद्यार्थी आणि तीस विद्यार्थिनी असत. त्यांच्या आग्रहामुळे मी अर्ज दाखल केला. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काही विद्यार्थ्यांनी माझ्या भोवती गराडा घालून विचारलं,

''तुम्ही दोन दिवसांची सहल काढू शकता का? नाहीतर अर्ज मागे घ्या.''

मी धाडसाने सहल काढायला होकार दिला. घरून परवानगी मिळेल का, अशी शंका मात्र मनात होती.

यापुढील लेख
मूळ दिवाळी अंकात वाचा


# प्रबोधनाचे अक्षरलेणे
## ४०० व्या अंकाच्या निमित्ताने












१०० वा अंक


२०० वा अंक


३०० वा अंक






**'छात्र प्रबोधन'** सुरू होऊन बघता बघता ३३ वर्षे सरली अन् 'छात्र प्रबोधन'चा हा ४०० वा अंक, दिवाळी अंक म्हणून मोठ्या उत्साहाने सज्ज झाला आहे. त्या निमित्ताने मागे वळून पाहताना... कुमारांच्या व्यक्तिमत्त्व विकसनाचे साधन म्हणून मासिक सुरू करण्याचे जे स्वप्न ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पासाहेब पेंडसे यांनी पाहिले होते, ते प्रत्यक्षात आणताना अनेक जणांचे हात या कार्याला लाभले. त्यातील निवडक व्यक्तींच्या नजरेतून छात्र प्रबोधन अर्थात छात्र प्रबोधनबरोबरचा त्यांचा प्रवास, मनोगत इ. विषयी **प्रबोधनाचे अक्षरलेणे** या विशेष विभागात प्रातिनिधिक स्वरूपात वाचू या.

छात्र प्रबोधनचे सुरुवातीपासूनचे **प्रयोगशील संपादक मा. महेन्द्रभाई सेठिया** यांनी उलगडलेला ३३ वर्षांचा पट आणि आगामी काळात व्यक्त केलेल्या अपेक्षा हे सुरुवातीच्या लेखात वाचू या!

या परिवारात अगदी सुरुवातीपासून सहभागी झालेले **ज्येष्ठ लेखक प्रवीण दवणे, मल्हार अरणकल्ले**, स्वयंसेवी वृत्तीने दिवाळी अंकांचे वितरण उत्साहाने करणारे अलिबागचे **केंद्रप्रमुख श्री. राम जोशी** यांची 'छात्र प्रबोधन' विषयीची मनोगते वाचू या. पाठ्यपुस्तकात समाविष्ट झालेल्या छात्र प्रबोधनमधील काही लेखांविषयी संपादक मंडळातील ज्येष्ठ सदस्या **स्वातीताई ताडफळे** यांनी रसास्वादपर लेख लिहिला आहे.

याशिवाय छात्र प्रबोधनची सुरुवातीची वाचक ते कार्यकारी संपादक असा अनुभव घेणारी **दीपालीताई गोगटे** आणि विद्यार्थी संपादक मंडळात सहभागी झालेली **मृण्मयी वैशंपायन** यांचे प्रेरणादायी लेख वाचू या. याशिवाय दिवाळी अंकाविषयी मान्यवरांच्या प्रतिक्रिया व क्यू आर कोडला जोडलेले साहित्य अवश्य वाचा, ऐका.

एकूणच **'दिव्याने दिवा लावावा आणि लक्ष दीप उजळले जावे'**, अशी ही 'छात्र प्रबोधन'ची ४०० व्या अंकापर्यंतची प्रकाशमान वाटचाल! तुम्ही सर्व या प्रकाशवाटेचे प्रवासी–सहकारी–अध्वर्यू व्हावेत, या अपेक्षेसह!!

# ४०० व्या अंकाच्या निमित्ताने...

– महेन्द्र सेठिया

**प्रिय उत्साही, धडपडणाऱ्या प्रबोधकांनो,**

'छात्र प्रबोधन'चा हा ४०० वा अंक! चारशे अंकांचा हा प्रवास अंगावर रोमांच उभं करणारा आहे! पहिला अंक प्रकशित करताना, 'वर्षभर तरी नियमितपणे अंक काढणं आपल्याला जमेल का,' अशी साशंकता मनात होती. मुलांसाठीची अनेक दिग्गज मासिकं एकेक करून बंद पडत होती, त्यात 'छात्र प्रबोधन'चा निभाव लागेल का? असा संभ्रम अनेकांच्या बोलण्यातून जाणवत होता. अशा पार्श्वभूमीवर अनेकांनी भरभरून व मनापासून केलेल्या सहकार्यामुळे ३३ वर्षांची वाटचाल पूर्ण करून, पूर्वी इतक्याच उत्साहाने, नवनवीन स्वप्ने पाहात 'छात्र प्रबोधन'ची पुढची वाटचाल चालू आहे, याचा मनापासून आनंद वाटतो.

हजारच्या वर लेखक, अनेक चित्रकार, हजारो देणगीदार, गावोगावचे शेकडो कार्यकर्ते, शिक्षक यांनी 'छात्र प्रबोधन'वर जे मनापासून प्रेम केलं, भरभरून योगदान दिलं, वेळोवेळी प्रोत्साहन दिलं त्या सर्वांबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयातील सदस्य, कार्यकारी संपादक आणि संपादक मंडळातील सदस्य यांच्या झोकून देऊन केलेल्या सांघिक प्रयत्नांमुळेच नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणता आल्या, त्यांच्याप्रति व त्यांच्या कुटुंबियांच्याप्रतिही मी कृतज्ञता व्यक्त करतो.

'छात्र प्रबोधन'चे वाचक विद्यार्थी व त्यांच्यातून घडत गेलेले युवक-युवती कार्यकर्ते हे 'छात्र प्रबोधन'साठी कायमच ऊर्जास्रोत राहिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची चळवळ बहरायला त्या सर्वांचा जबाबदारीपूर्ण सहभाग खूपच मोलाचा राहिला आहे. 'ज्ञान प्रबोधिनी'च्या संस्थेचा वारसा, प्रबोधिनीची समाजमनातील प्रतिमा, सर्व विभागांचे साहचर्य, ज्येष्ठांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन या सर्वांचा या वाटचालीत खूप महत्त्वाचा वाटा आहे.

**'प्रयोगशीलता'** आणि **'नावीन्य'** ही 'छात्र प्रबोधन'ची खास वैशिष्ट्ये! दिवाळी अंकातल्या कल्पक भेटी, नावीन्यपूर्ण स्पर्धा, लेखांना क्यूआर कोडद्वारे ध्वनि-चित्रफितींची जोड, कोरोना काळात सुरू झालेला 'ऐपावाक' (ऐका, पाहा, वाचा, करा) हा उपक्रम, दूरभाषद्वारे ऐकता येईल असे 'बोलके' दिवाळी अंक, ब्रेल लिपीतले दिवाळी अंक, दूरस्थ व प्रत्यक्ष लेखन-अभिवाचन कार्यशाळा, साहित्य मेळावे, कुमार साहित्य संमेलने, एक पानी-सहा पानी पुस्तकसंच, प्रबोधन दूत योजना, दिनदर्शिका, अंकातील दर्जेदार साहित्यातून *डिव्हिडी* व पुस्तकनिर्मिती, विविधांगी शिबिरांची मालिका, स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांची गटबांधणी, घरोघरी ग्रंथालय, जोडीकार्ये व वर्गोद्दिष्टे, अंकातील विषयांमधलं वैविध्य-छपाईतले प्रयोग, ही त्यातली काही उदाहरणे. एकेक कल्पना प्रत्यक्षात आणताना केलेला सांघिक आटापिटा सर्वांनाच समृद्ध करणारा, आनंद देणारा आणि 'छात्र प्रबोधन'ला नवीन उंचीवर घेऊन जाणारा ठरला!

गेल्या ३३ वर्षांत एक लाखांहून अधिक विद्यार्थी मासिकाचे सभासद होऊन गेले. ९ लाख घरांमध्ये दिवाळी अंक पोहोचले. शिबिरं, कार्यशाळा, स्पर्धा-मेळावे-संमेलने या सर्वांमधून सुमारे २५ हजार विद्यार्थी सहभागी झाले. सुमारे २५ हजार पानांची साहित्य-निर्मिती झाली. काही 'शे' लेखकांना कुमारांसाठी लिहितं



वार्षिक देणगीदार - • श्री. सौरभ फाटक, डोंबिवली • श्री. प्रसन्न राखे, छ. संभाजीनगर
• श्री. तन्मय बुडुख, पुणे • श्री. डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, पुणे

करता आलं. सुमारे एक हजार हितचिंतकांकडून अर्थसाहाय्य उभं करता आलं. त्यातून मासिकाचं आर्थिक स्वावलंबन टिकवता आलं. हे आतापर्यंतच्या वाटचालीतील छात्र प्रबोधनचे ठळक, लक्षवेधक बाबी!

मासिकाच्या वाटचालीतला ४०० वा अंकाचा टप्पा तसा तारुण्यावस्थेतलाच कालखंड म्हणायला हवा. स्थिरतेला गतिमानतेची, कालोचिततेची, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, नवीन शैक्षणिक धोरणाला पूरक ठरणारी मासिकाची वाटचाल व्हावी ही अपेक्षा आहे. महाराष्ट्रातल्या सर्व प्रादेशिक भागांमधील शहरी-ग्रामीण-आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत मासिक व मासिकाद्वारे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसनाचे उपक्रम पोहोचण्यासाठी रचना उभी राहायला हवी आहे. वाचनाची गोडी आणि साहित्याची अभिरुची वाढविण्याच्या प्रयत्नांचा वेगाने विस्तार व्हायला हवा आहे. बालकुमारांसाठी साहित्य प्रकाशित करणाऱ्या प्रकाशक, संपादकांच्या साहचर्याचे जाळे निर्माण करण्यात पुढाकार घ्यायला हवा आहे. तरुण लेखकांना कुमारांसाठी लिहितं करायचं आहे. मासिकाची गुणवत्ता व परिणामकारकता वाढवण्यासाठी संशोधनाची जोड द्यायला हवी आहे. अशा अनेकविध अपेक्षांना व कल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ व अर्थबळाची उभारणी करावी लागणार आहे. 'छात्र प्रबोधन'चे वाचक, त्यांचे कुटुंबीय, शिक्षक, माजी वाचक-विद्यार्थी यांनी या आवाहनाला प्रतिसाद द्यावा ही अपेक्षा!

यापुढे 'छात्र प्रबोधन'ची धुरा संपादक म्हणून शिल्पाताई कुलकर्णी व व्यवस्थापकीय समन्वयक म्हणून रूपालीताई बापट समर्थपणे सांभाळतील असा विश्वास वाटतो. त्यांना पुढील गतिमान वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा! त्यांना तुमच्या सर्वांची भरभरून साथ मिळेल, असा विश्वास बाळगून आहे.

**सस्नेह तुमचा**

**- महेन्द्र सेठिया**

# मूल्यसंस्कार जोपासणाऱ्या प्रयोगशाळेत...

**- प्रवीण दवणे**

लेखणीचा कार्यकर्ता म्हणून या नवी पिढी घडवणाऱ्या आणि जीवनाचं मूल्यभान जपणाऱ्या 'छात्र प्रबोधन' नियतकालिकात मी नियमानं लेखन केलं. आपलं लेखन या नव्या पिढीपर्यंत व त्यांच्या सुजाण पालकांपर्यंत आणि प्रयोगशील अध्यापकांपर्यंत पोहोचते आहे व ते रुजते आहे, याची प्रचीती गावोगावच्या व्याख्यान मुशाफिरीत येत गेली.

'छात्र प्रबोधन'च्या संपादकीय विभागानं माझ्याकडून ललित लेख, कथा, कविता असं विविध प्रकारचं लेखन आवर्जून करून घेतलं. 'छात्र प्रबोधन' साठी लेखन-बैठक जमवणं हे मला नेहमीच विशेष जबाबदारीचं वाटत; कारण शिक्षक आणि पालक नव्या पिढीच्या हाती एखाद्या निरांजनाप्रमाणे माझं लेखन 'छात्र प्रबोधन'च्या तबकातून देणार आहेत, याची मला पूर्णपणे कल्पना असते. त्यामुळेच विषयांची विविधता आणि नावीन्य शोधण्यात एक आनंददायी सर्जनशील दमछाक होते.

**पूर्ण लेख वाचण्यासाठी मूळ दिवाळी अंक पाहा**



**भेट द्या : लोटस टेंपल (न्यू दिल्ली)** - हे कमळ मंदिर म्हणूनही ओळखले जाते. या मंदिरात कोणत्याही मूर्ती किंवा धार्मिक चिन्हे नाहीत. त्यामुळे सर्व धर्मांचा येथे आदर केला जातो.

वार्षिक देणगीदार - • श्रीमती आरती अजित पटवर्धन, पुणे • श्री. कौस्तुभ हळबे, पुणे • श्री. प्रवीण साळी, धुळे • सौ. मृण्मयी पाटणकर, पुणे

# ‘छात्र प्रबोधन’ आणि मी

**- राम जोशी**




**‘छात्र प्रबोधन’ अंकांचे वितरण आपापल्या भागात करण्यासाठी अनेक कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे पुढे आले. त्यापैकी अलिबाग केंद्राचे श्री. राम जोशी यांनी २५ वर्षांहून अधिक काळ निष्ठेने, स्वयंसेवीवृत्तीने ‘छात्र प्रबोधन’च्या दिवाळी अंकांचे वितरण केले. अलिबाग येथे अनेक वर्षे उपक्रम केंद्र चालविले. त्यांच्या छात्र प्रबोधनच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊ या सोबतच्या लेखात...**

---

एखादी घटना आपल्या आयुष्यात का घडते हे आपल्याला समजतंच असं नाही. तसंच ‘माझ्या आयुष्यात ‘ज्ञान प्रबोधिनी’ का आली’, हे मला अजूनही समजलेलं नाही; पण जे झालं, ते चांगलं झालं हे निश्चित!

माझा आणि ज्ञान प्रबोधिनीचा संपर्क तसा अचानकच झाला. अलिबागमध्येच झालेल्या वैदिक गणिताच्या एका कार्यक्रमात ‘छात्र प्रबोधन’चे छोट्या स्वरूपातले काही अंक पाहायला मिळाले. ते अंक पहिल्या पाच वर्षांतले होते. एकंदरीत अंक नजरेखाली घालताना त्याची सुटसुटीत, सोपी आणि बरंच काही देणारी मांडणी मनाला भुरळ घालणारी होती. पूर्ण अंक ‘अ ते ज्ञ’ वाचून काढावा इतका सुंदर वाटला. ‘हे अंक अलिबाग परिसरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत’, हा विचार आम्हा चार जणांच्या डोक्यात घर करून गेला. एकाने पुण्यात फेरी मारून महेंद्रभाईंची भेट घेतली. सभासद नोंदणीसाठी सगळे तपशील समजावून घेतले; आणि अलिबाग वितरण केंद्राची वाटचाल सुरू झाली. खरंतर घोडदौडच म्हणायला हवी; कारण दहा-पंधरा दिवसांतच आमची नोंदणी १०० च्या वर झाली. महेंद्रभाईंच्या प्रेरणादायी भेटीतून अलिबाग परिसरात कार्यक्रम सुरू झाले. ‘छात्र प्रबोधन’ मासिकाच्या माध्यमातून ‘ज्ञान प्रबोधिनी’शी संपर्क वाढत गेला.

‘छात्र प्रबोधन’ मासिकामार्फत अनेक शाळांचा संपर्क वाढला. विद्यार्थ्यांशी वाढलेला संपर्क हा माझा वैयक्तिक फायदा. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन किती झालं? हे मला माहीत नाही; पण माझं ‘विकसन’ मात्र बऱ्यापैकी झालं यात वाद नाही. या व्यक्तिमत्त्व विकास चळवळीच्या निमित्तानं मी स्वतःकडे बघायला शिकलो. ‘व्यक्तिमत्त्व विकासाची साधनं, मार्ग कोणते असू शकतात,’ यावर चिंतन आणि मार्गदर्शन, संयोजक आणि केंद्रप्रमुख शिबिरातून मिळत गेलं. ‘ज्ञान प्रबोधिनी’त या संबंधात सुरू असलेले अनेक प्रयोग बघता आले. ज्ञान प्रबोधिनीची वैचारिक भूमिका उलगडत गेली. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक माननीय डॉ. गिरीशराव बापट आणि माजी कार्यवाह श्री. सुभाषराव देशपांडे यांच्या अलिबाग केंद्राच्या भेटी प्रेरणादायी ठरल्या. प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेविषयी त्यांनी केलेली अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी आम्हा सगळ्यांच्यात उत्साह भरणारीच ठरली.

प्रबोधिनीच्या एका पद्यातल्या ओळी मनात घुमू लागल्या,

*विकसता विकसता विकसावे*
*मन विशाल समृद्ध करावे*
*मन त्वरे जनपदी रमवावे*


बघता बघता सदस्य संख्या ४०० च्या घरात पोहोचली.

**पूर्ण लेख वाचण्यासाठी**
**मूळ दिवाळी अंक पाहा**

# 'छात्र प्रबोधन'ची पाठ्यपुस्तकांतील मुशाफिरी

– स्वाती ताडफळे

मुलांच्या कळत्या वयापासून त्यांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग असलेली पुस्तके म्हणजे त्यांची 'क्रमिक पाठ्यपुस्तके!' आणि त्यांचं खरं भावविश्व फुलतं, उमलतं ते त्यांच्या भाषेच्या पाठ्यपुस्तकांतून! 'बालभारती' तथा 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' या संस्थेमार्फत महाराष्ट्रात सर्व पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते. देशाच्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार' राज्याचा अभ्यासक्रम आराखडा ठरवला जातो.




भारताची एकात्मता जोपासण्याच्या दृष्टिकोनातून जे घटक शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत करणं आवश्यक असतात, त्या दृष्टीने अपेक्षित मूल्यं विचारात घेतली जातात. या मूल्यांची रुजवणूक करणारे साहित्य पाठ्यपुस्तकांत अंतर्भूत केलं जातं. याव्यतिरिक्त साहित्यप्रकारांचे वैविध्य, प्रादेशिकता, बोली भाषा, संस्कृती इत्यादी विविध व अनेक घटकांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष विचार पाठ्यपुस्तकातील साहित्याच्या लेखनामागे व निवडीमागे असतो.

प्राथमिक स्तरावर पाठ्यपुस्तकाच्या आराखड्यानुसार भाषा समिती सदस्य, अभ्यास मंडळ सदस्य स्वतंत्रपणे/पाठांचे/घटकांचे लेखन करतात. माध्यमिक स्तरावर प्रकाशित झालेल्या पुस्तकांतून, मासिकांतून नामवंत साहित्यिकांच्या साहित्यकृती निवडल्या जातात. असं साहित्य निवडतानाही 'मूल्यांचा' विचार महत्त्वाचा ठरतो.

पाठ्यपुस्तकातील समाविष्ट साहित्य हे दिलेल्या निकषांना आधारभूत मानून अंतिम केलं जातं.

'ज्ञान प्रबोधिनी' संस्थेतर्फे खास कुमारवयीन मुलांसाठी प्रकाशित होणारं 'छात्र प्रबोधन' हे मासिक मुलांच्या सर्वांगीण घडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारं मासिक आहे. मुलांच्या कृतिशीलतेला, सर्जनशीलतेला वाव देणारं हे मासिक असून दर्जेदार, वैविध्यपूर्ण साहित्य हे या मासिकाचं बलस्थान आहे.

बालभारतीच्या मराठी भाषा विषयाच्या काही पाठ्यपुस्तकांत 'छात्र प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेल्या काही निवडक लेखांचा सन्मानपूर्वक समावेश करण्यात आला आहे. समाधानाची गोष्ट अशी की, **'छात्र प्रबोधन' मध्ये प्रकाशित झालेले लेख केवळ 'उत्कृष्ट साहित्यमूल्य' या एकाच निकषावर आधारित नसून, 'संस्कारक्षम मूल्यां'चा भाषिक अंगाने केलेला विचार प्रतिबिंबित करतात. पाठ्यपुस्तकांतील त्यांचा समावेश या दृष्टीने अर्थपूर्ण ठरतो.**

काही वानगीदाखल उदाहरणांनी आपण बालभारतीच्या प्रचलित मराठी भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तकांतील 'छात्र प्रबोधन' ची मुशाफिरी जाणून घेऊ या.

आपण इयत्ता १० वीच्या पाठ्यपुस्तकांतील वानगीदाखल काही उदाहरणे पाहू.

१) इयत्ता १० वी मराठी प्रथम भाषा या पाठ्यपुस्तकात **'बोलतो मराठी'** हा **नीलिमा गुंडी** यांनी लिहिलेला पाठ समाविष्ट करण्यात आलेला आहे,

पूर्ण लेख वाचण्यासाठी
मूळ दिवाळी अंक पाहा

छात्र प्रबोधन ४०० वा अंक

भावभक्तिची ओंजळ अमुची, इथे आम्ही वाहतो ।
नव्या पिढीचे स्वप्न उद्याचे, फुलताना पाहतो ।।

शुभेच्छुक - • श्री. सत्येंद्र वैद्य, पुणे • सौ. आकांक्षा काशीकर, पुणे
• सौ. रसिका चिकटे शर्मा, पुणे • श्री. योगेश्वर गोखले, पुणे

# वैचारिक बांधीलकीची चारशे समर्थ पावलं...

- मल्हार अरणकल्ले

**'छात्र प्रबोधन' मासिकाची चारशेव्या अंकापर्यंत झालेली वाटचाल हा अभिमानास्पद आणि आनंददायक टप्पा आहे. कुमारवयीन मुलांना सकस वाचनासाठी विविध विषयांतलं साहित्य देण्याचं आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचं स्वप्न किती मोठी झेप घेऊ शकतं, त्याचं 'छात्र प्रबोधन' हे बोलकं उदाहरण... साहित्यप्रकारातलं... आणि कृतिशीलता जोपासणारंही...!**

व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी मुद्रित मासिकासारखं माध्यम वापरणं ही कल्पना सुरुवातीला मुळातच अतिशय आव्हानात्मक होती. आजच्या विशेषतः कुमारवयीन मुलांना कोणत्या स्वरूपाचं मासिक अभिप्रेत आहे, त्याचा आराखडा कुणापुढेच नव्हता. कुणी त्याचा शोधही घेतला नव्हता. शहरांपासून वाड्याखेड्यांपर्यंत आणि ऊसतोडणी कामगारांच्या झोपड्यांपासून ते आदिवासी पाड्यांपर्यंत राज्यभर पसरलेल्या कुमारवयीन मुलांना नवं-बदलतं जग समजून घेण्याची, अंगभूत कृतिशीलतेला चालना देण्याची ओढ लागलेली होती. ती फार कुणाच्या दृष्टिकक्षेत येत नव्हती. ही पोकळी जेवढी मोठी होती, तेवढीच दुर्लक्षितही होती.

कुमारवयीन मुलामुलींच्या व्यक्तिमत्त्वाचं विकसन करण्यासाठी त्यांच्याशी संपर्काचं प्रभावी साधन हवं, असं ज्ञान प्रबोधिनीला नेहमी वाटत असे. मुद्रित मासिकाची कल्पना त्यातून पुढे साकार झाली. सातत्याने नव्याचा शोध आणि त्याच्या अंमलबजावणीचं तपशीलवार पूर्वनियोजन हा प्रबोधिनीचाच संस्कार आहे. त्यानुसार 'छात्र प्रबोधन' मासिकाच्या स्वरूपावर, त्यातल्या मजकुरावर, लेखनप्रकारांवर, दर्जेदारपणावर, वितरणव्यवस्थेवर चर्चांच्या अनेक फेऱ्या झाल्या. 'प्रबोधन'चा पहिला अंक अशा वैचारिक घुसळणीतून सुरू झाला. ते वर्ष होतं १९९२-९३!

छात्र प्रबोधनचं सुरुवातीचं रूप वृत्तपत्राच्या आकारातलं होतं; छोटं, चार पानांचं, नाव होतं 'प्रबोधन.' वृत्तपत्र किंवा मासिक प्रसिद्ध करून वितरित करण्यासाठी सरकारकडं त्याची नोंदणी करून परवानगी घ्यावी लागते. *'रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया' (आरएनआय)* यांच्याकडून ती दिली जाते. ती प्रक्रिया सुरू होती; म्हणून या मासिकाचं तात्पुरतं नाव केवळ 'प्रबोधन' असं होतं. आताच्या 'छात्र प्रबोधन' नावाला नंतर मान्यता मिळाली. विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी मिसळून गेलेले शिक्षक सुरुवातीला संपादक मंडळात होते. त्यांत महेंद्रभाईंच्या बरोबरीनं विवेकराव पोंक्षे, शैलजाताई (देशमुख) होत्या. संपादक मंडळाच्या कल्पनांतून अंकाचं स्वरूप बदलत गेलं. त्यात विविधता येत गेली. या अंकाला आतासारखं चाररंगी मुखपृष्ठ नव्हतं आणि मलपृष्ठही नव्हतं.

मुखपृष्ठावर काय होतं मग? ...तर अनुक्रमणिका! आणि वाचक कोण? ...तर चारशे-पाचशे विद्यार्थी. अभ्यासासाठी पूरक ठरणारं, व्यावहारिक ज्ञान देणारं, नवं तंत्रज्ञान, नवे शोध यांची माहिती सांगणारं, आसपासच्या घडामोडींचा अर्थ स्पष्ट करणारं आणि

**पूर्ण लेख वाचण्यासाठी मूळ दिवाळी अंक पाहा**

फुलपाखरांच्या मागोव्याने, जिथे रंगविली स्वप्ने ।
त्या निसर्गाच्या भूमीत, आज उगवली रत्ने ।।

शुभेच्छुक - • सौ. स्मिता फडणवीस, बोरिवली, मुंबई
• श्रीमती शोभना अभ्यंकर, बोरिवली, मुंबई

# वाचक, कार्यकर्ती ते कार्यकारी संपादक

**- दीपाली गोगटे**

छात्र प्रबोधन मासिकाची वाचक-कार्यकर्ती ते कार्यकारी संपादक हा प्रवास ८ वर्षांचा. 'खरंतर फारच छोट्या कालावधीचा; पण लांब पल्ल्याचा!!'

माझी इ. १० वीची नुकतीच परीक्षा झालेली. एके दिवशी माझे वडील महेंद्रभाईंना घरी घेऊन आले. अशा आलेल्या पाहुण्यांशी जशी घरातली मुलं जुजबी बोलून सटकतात तसाच काहीसा माझाही विचार असावा; पण महेंद्रभाईंनी उगाच इकडच्या तिकडच्या चौकशा न करता सरळ सुट्टीत पुण्याला शिबिराला येण्याचं सुचवलं. आणि मी 'छात्र प्रबोधन'च्या परिवारात सामील झाले.

बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी पुण्यात आले आणि मग 'छात्र प्रबोधन'चं कार्यालय हे दुसरं घरच झालं. सुट्टीतली तंबुतली शिबिरं, गिरिभ्रमण, राखी विक्री हे तर उपक्रम होतेच; पण याच्या बरोबरीने मासिकाच्या कामात लुडबूडही सुरू झाली. विशेषतः दिवाळी अंकाच्या वेळी तर कामाची लयलूट असायची.

त्यानंतर दोनेक पदव्या चिकटल्या आणि काही ठिकाणी कामाचा थोडासा अनुभवही घेऊन झाला. त्यानंतर एका भेटीत जेव्हा 'छात्र प्रबोधनची कार्यकारी संपादक होशील का', अशी विचारणा महेंद्रभाईंकडून झाली, तेव्हा लगेच 'हो' म्हणण्याइतकं ते स्वाभाविक होतं. त्यानंतरची दोन वर्षं मनसोक्त कामाच्या आनंदात गेली. आपण आवडीचं काम करत असलो की, चोवीस तास आपण कामाच्या विचारात राहतो आणि तरीही त्याचा ताण येत नाही; याचा पहिला अनुभव त्या वयात मला मिळाला हे माझं सुदैव!

नवीन विषयांवर आमच्या अखंड चर्चा चालायच्या. नवनवीन कल्पना घुसळल्या जायच्या. कुठलीही कल्पना चुकीची नसायची. कुठल्याही कल्पनेकडे दुर्लक्ष व्हायचं नाही. संपादक मंडळातला प्रत्येक जण त्याच्या खास शैलीत आपल्या कल्पना मांडायचा. महेंद्रभाई, शैलजाताई, नीलिमाताई, दत्ताकाका सर्वच जण वय आणि अनुभव यांनी मोठे होते; पण त्यावेळचा 'माहोल' आठवतो तो मुक्त चर्चांचा! कार्यकारी संपादक म्हणून त्यातील कल्पनांना कागदावर आणि नंतर मुलांच्या हातापर्यंत पोहोचवेपर्यंतचा संपूर्ण प्रवास मला घडवता आला. त्या काळातले तपशील आता खूपच पुसट झालेत; पण त्या दिवसांत मिळालेलं स्वातंत्र्य आणि विश्वास मात्र आत्ताही मनात ताजा आहे. 'पण तुला जमेल का', हे वाक्य तेव्हा मला कुणीही ऐकवलं नाही. आणि त्याचाच संस्कार झाल्यानं पुढं मीही कुणाला ते ऐकवलं नाही.

माझ्या दोन वर्षांच्या कालावधीत मला तीन दिवाळी अंक करता आले. प्रत्येक दिवाळी अंक म्हणजे कल्पकता, नियोजन, काटेकोरपणा, मस्ती यांचं अद्भुत रसायन होतं. दिवाळी अंकाचं मुखपृष्ठ आणि दिवाळी अंकाची भेट यावर कितीदा बोलायला बसलो असू याची गणतीच नसायची. आपल्या बाजूनं काटेकोर नियोजन केलं, तरी हातात नसलेले असंख्य घटक असायचे. अंक छपाईला सोडण्याची तारीख दिसत असायची; तोवर अनेक आघाड्यांवर हाणामारी चालायची. त्या चार महिन्यांत मिळालेला हा बौद्धिक आनंद अविस्मरणीय आहे.

'छात्र प्रबोधन'च्या माध्यमातून नामवंत लेखक, कलावंत, विविध क्षेत्रांतल्या दिग्गज व्यक्ती यांनी मुलांसाठी लिहितं व्हावं, यासाठीचा संपादक मंडळाचा प्रयत्न असायचा. त्या निमित्तानं मला अनेक नामवंत व्यक्तींशी बोलण्याची संधी मिळाली.

**पूर्ण लेख वाचण्यासाठी मूळ दिवाळी अंक पाहा**

# ‘छात्र प्रबोधन’-अनुभवांची खाण!

**– मृण्मयी वैशंपायन**

‘छात्र प्रबोधन’ वाचण्याच्या माझ्या आठवणी प्राथमिक शाळेपासून सुरू होतात. आमच्या घरच्या दिवाळी अंकांमध्ये माझ्यासाठी खास ‘किशोर’ आणि ‘छात्र प्रबोधन’ असे अंक दरवर्षी आपसूक येऊन पडायचे! दिवाळीची सुट्टी मल्हार अरणकल्ले, संजय ढोले अशा दिग्गजांच्या गोष्टी वाचण्यात, वाचून दाखवण्यात आणि दिवाळी अंकामधल्या भेटवस्तू स्वतःच्या हातानं बनवण्याच्या आनंदात जायची.

पुढे ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतून ‘आमच्या शाळेचा भारी दिवाळी अंक’ घरोघरी जाऊन विकण्याची सुरुवात झाली. तेव्हा जो दिवाळी अंक इतक्या आत्मीयतेने विकता, तो तयार कसा होतो? त्या प्रक्रियेत कोण कोण सहभागी असतं? त्या-त्या वर्षीच्या अंकात काय-काय असणार आहे? असं सगळं अंकाचे संपादक ‘महेंद्रभाई’ आम्हाला सांगायचे. त्यांचं बोलणं ऐकून आम्ही सगळे झपाटून विक्रीच्या कामाला लगायचो. वर्गावर्गांमध्ये चुरस लागायची!

‘छात्र प्रबोधन’ची वाढदिवसाला येणारी पत्रं ही अजून एक महत्त्वाची आठवण! सुंदर हस्ताक्षरातली ती पत्रं मलाच उद्देशून लिहिलेली असायची. वाढदिवसाला तसं पाहायला गेलं, तर अनोळखी व्यक्तींकडून आलेलं एवढं वैयक्तिक पत्र वाचून आपण फारच महत्त्वाचे कुणीतरी आहोत आणि आपण खूप भारी कुणीतरी व्हायला हवं असं वाटायचं!

कुमार महोत्सव आणि विस्तार शिबिरं या दोन्ही उपक्रमांमध्ये महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या गावांमधल्या माझ्याच वयाच्या किंवा थोड्या लहान मुला-मुलींशी मैत्री करता आली, त्यांच्या घरी जाऊन राहता आलं, त्यांना माझ्या घरी राहायला बोलवता आलं. या सगळ्या देवाणघेवाणींमधून, ही वेगळ्याच

**अनेकदा दिवाळीच्या आधीची ‘छात्र प्रबोधन’ कार्यालयातली धावपळ जवळून बघायला मिळायची. मग नुकतेच छापून आलेले गरम-गरम लागणारे अंक हातात घेऊन बघितलेले पण आठवतंय... या सगळ्यातूनच कदाचित दहावी झाल्यावर विद्यार्थी विशेषांकाचं संपादन करून बघू या असं मी ठरवलं!**

गावांमधली मुलं-मुली अचानक माझे मित्र-मैत्रिणी होऊन गेली. नंतरची काही वर्ष त्यांच्याबरोबरचा पत्रसंवाद चालू राहिला. वेगळ्या गावातही आपले मित्र आहेत ही जाणीव त्या वयात आनंददायी होती.

शाळेत असताना कुमार महोत्सवात मनसोक्त सहभागी झाल्यावर, वेगवेगळ्या गावी जाऊन ‘छात्र प्रबोधन’ची विस्तार शिबिरं घेऊन आल्यावर आपोआप ‘छात्र प्रबोधन’च्या कार्यालयातल्या चकरा वाढल्या. अनेकदा दिवाळीच्या आधीची छात्र प्रबोधन कार्यालयातली धावपळ जवळून बघायला मिळायची. मग नुकतेच छापून आलेले गरम-गरम लागणारे अंक हातात घेऊन बघितलेले पण आठवतंय... या सगळ्यातूनच कदाचित दहावी झाल्यावर विद्यार्थी विशेषांकाचं संपादन करून बघू या असं ठरवलं!

अंकाच्या निमित्ताने भरपूर चर्चा केल्या, भरपूर लोकांशी गप्पा मारल्या, हक्काने लेखकांना आठवणींचे फोन केले. त्याचबरोबर आलेला मजकूर संपादित करणं, *कॉम्प्युटरवर लेआऊट* लावणं, चित्रकारांना आपल्या डोक्यातल्या कल्पना समजावून सांगणं, मग २-३ फेऱ्या मुद्रितशोधन, त्यानिमित्तानं कळलेले अनेक शब्द...असे २ महिने आनंदात आणि नवीन

**पूर्ण लेख वाचण्यासाठी मूळ दिवाळी अंक पाहा**


# प्रबोधन दूत योजना आणि विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन

– दिगंबर गिरीबुवा

ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधनतर्फे प्रबोधन दूत ही प्रयोगशील शिक्षकांसाठी एक योजना आहे! विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची हौस वाढावी, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण व्हावी, स्वयंविकासाची प्रेरणा जागृत व्हावी अशी व इतर अनेक उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून ही योजना सुरू करण्यात आली. दोन वर्षांपूर्वी या योजनेत सहभागी होण्याची संधी आदरणीय महेन्द्रभाई सेठिया यांनी दिली.

या प्रबोधन दूत योजनेअंतर्गत शिक्षकांना त्यांच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी काही पुस्तकांचे मोफत संच देण्यात येतात. वर्षातून किमान दोनदा शिक्षकांसाठी निवासी शिबिर आयोजित केले जाते. त्याचबरोबर वर्गोद्दिष्ट स्पर्धा, कल्पक स्पर्धा, घरोघरी ग्रंथालय, सुट्टीतील उपक्रम, जिज्ञासा ग्रंथालय, अभिवाचन स्पर्धा–कार्यशाळा, हस्तलिखित स्पर्धा इत्यादी अनेक उपक्रम या प्रबोधन दूत योजनेअंतर्गत आमच्या शाळेत राबविण्यात आले. या स्पर्धांच्यामधून यश मिळो अथवा न मिळो पण आपल्यामध्ये ती क्षमता आहे की नाही हे या मुला मुलींना तपासून पाहता आलं आणि खऱ्या अर्थाने त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन होत गेलं

आमच्या शाळेत येणाऱ्या दुर्गम भागातील गोरगरीब व शिकण्याची जिद्द असणाऱ्या मुलींसाठी चाकोरीच्या बाहेर जाऊन काहीतरी करण्याची तळमळीची इच्छा कायमच मनात असते. ‘प्रबोधन दूत योजने’मुळे ही संधी मिळाली. या योजनेत सहभागी झाल्यानंतर आमच्या शाळेतील मुला– मुलींनी जवळजवळ सर्व वर्गोद्दिष्ट स्पर्धांमध्ये नुसता भाग घेतला नाही, तर त्यामध्ये बक्षिसे सुद्धा मिळवली. या वर्गोद्दिष्ट स्पर्धेत भाग घेत असताना संबंधित वर्ग पूर्ण एकाच उद्दिष्टाने झपाटून जात होता.



‘घरोघरी ग्रंथालय’ यासारख्या उपक्रमांमधून आमच्या शाळेतील मुला मुलींना वाचनाची अत्यंत गोडी लागली. दर आठवड्याला शुक्रवारी शाळा सुटल्यानंतर आमच्या शाळेत चालणाऱ्या कट्ट्यावर ‘प्रबोधन दूत योजने’अंतर्गत मिळालेल्या पुस्तकांची आणि स्वतः विकत घेतलेल्या छात्र प्रबोधन दिवाळी अंकाची मनसोक्त चर्चा होते. ‘प्रबोधन दूत योजने’अंतर्गत आणखी आपल्यासाठी नवीन काय येणार आहे याची उत्सुकता आतुरता ही आमच्या शाळेतील मुला मुलींना कायमच लागून राहिलेली असते.

ज्ञान प्रबोधिनी, छात्र प्रबोधन पुणे या संस्थेने या योजनेत सहभागी होऊन आमच्या शाळेतील मुला मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासनाची संधी दिली

**पूर्ण लेख वाचण्यासाठी मूळ दिवाळी अंक पाहा**



छात्र प्रबोधनचे खास कुमारांसाठी संग्राह्य कथासंग्रह



राम आणि श्यामच्या अद्भुत साहसयात्रा
लेखक – भारत सासणे
पृष्ठसंख्या – १४४, मूल्य ₹ १६०

आजकालच्या भाषेतलं थ्रिल, सस्पेन्स आणि ॲडव्हेंचर हे सगळंच तुम्हाला इथे अनुभवायला मिळणार आहे.

पुस्तक परिचयासाठी व पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!

# आजची ज्ञान प्रबोधिनी - (ज्ञान प्रबोधिनी, पुणे आणि सदस्य संस्था)

## शके १९४६ (मार्च २०२५ अखेर)

- **केंद्रे** – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी
- **उपकेंद्रे** – साळुंब्रे, शिवापूर, वेल्हे, शिरवळ
- **विस्तार केंद्रे** – अंबाजोगाई, डोंबिवली
- **उपक्रम केंद्र** – चिपळूण
- **संपर्क केंद्रे** – ठाणे, बदलापूर
- **कार्यक्षेत्रे** – शिक्षण, संशोधन, प्रदेश विकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री-शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता

### १. शिक्षण

- **ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

१. **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**संकेतस्थळ :** prashala.jnanaprabodhini.org
२. **ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल) **संकेतस्थळ :** jpnvnigdi.org
३. **शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे**
(ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रणालीचा विस्तार)
**संकेतस्थळ :** www. earc.jnanaprabodhini.org
४. **वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र**
५. **शैक्षणिक साधन केंद्र, पुणे** (शैक्षणिक व्हिडिओ व ॲप निर्मिती)
**संकेतस्थळ :** jnanaprabodhini.org/educational-resource-centre
६. **छात्र प्रबोधन, पुणे** (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
**संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org & jpprakashane.org
७. **मुक्त विद्या केंद्र**
८. **पूरक शिक्षण प्रकल्प – पुणे, निगडी, वेल्हे, डोंबिवली, रोहा, ठाणे, सोलापूर, बदलापूर, अंबाजोगाई, हराळी, चिपळूण, लातूर, नाशिक, कराड, अमरावती** (विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर**

९. **ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)
**संकेतस्थळ :** jnanaprabodhinisolapur.org
१०. **शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**
११. **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, हराळी** (प्राथमिक, माध्यमिक, सहनिवास)
**संकेतस्थळ :** www.jnanaprabodhini.org/harali
१२. **कृषी पदविका महाविद्यालय, हराळी**

- **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे**

१३. **ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे** (माध्यमिक, सहनिवास)
१४. **व्यवसाय प्रशिक्षण केंद्र – साळुंब्रे**

- **ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश**

१५. **कौशल्य प्रशिक्षण केंद्र - शिवापूर**
**संकेतस्थळ** – www.sdc.jnanaprabodhini.org

### २. संशोधन

- **ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था**

१. **प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे** (संशोधन, प्रशिक्षण, बुद्धीमापन, संवर्धन, समुपदेशन, शैक्षणिक) **संकेतस्थळ :** jpip.org
२. **संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, व्याख्याने, अभ्यासगट, मुस्लिम महिला विषयक अभ्यास प्रकल्प)
**संकेतस्थळ :** www.jnanaprabodhini.org/santrika/

### ३. प्रदेश विकसन

१. **नैसर्गिक संसाधने विकास विभाग– गुंजवणी खोरे, हराळी, अंबाजोगाई** (पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)
२. **सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

### ४. आरोग्य

- **ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास**

१. **दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**
**संकेतस्थळ :** dmhospital.org
२. **कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ** (नियमित तपासणी, शिबिरे, शस्त्रक्रिया)

### ५. समूहगुण विकसन व नेतृत्व संवर्धन

१. **युवक विभाग - पुणे, निगडी, सोलापूर, हराळी**
२. **युवती विभाग - पुणे, निगडी, सोलापूर, हराळी, अंबाजोगाई**
३. **नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे** (स्पर्धा परीक्षा, सामाजिक नेतृत्व यांसाठी प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)
**संकेतस्थळ :** www.netrutwavikas.jnanaprabodhini.org
४. **स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(स्पर्धात्मक क्षमता चाचणीच्या आधारे केंद्रीय व राज्य लोकसेवा परीक्षांचे मार्गदर्शन आणि अधिकारी नेटवर्क)
**संकेतस्थळ :**
www.jnanaprabodhini.org/competitive-examinations-centre

### ६. स्त्री-शक्ती प्रबोधन

१. **स्त्री शक्ती प्रबोधन-ग्रामीण-शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी–युवती–महिला विकास, स्वयंरोजगार)
२. **संवादिनी - पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर** (समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम, विद्याव्रत)

### ७. राष्ट्रीय एकात्मता

१. **नागरी वस्ती अभ्यासगट, पुणे**
२. **ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)
३. **ज्ञानसेतू प्रकल्प**
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू, काश्मीर, लेह–लडाख, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश)
**संकेतस्थळ :** https://gyansetu.earc.jnanaprabodhini.org/
४. **तंत्रस्नेही प्रकल्प (मणिपूर)**
५. **सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र**
(व्याख्याने, अभ्यासगट, संशोधन प्रकल्प, अभ्यासक्रम, प्रशिक्षण वर्ग)
**संकेतस्थळ :**
www.jnanaprabodhini.org/social-sciences-study-centre/

### ८. सामाजिक उद्योजकता

१. **उद्योजकता विकास केंद्र, पुणे**

**मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०** ☎ ०२०–२४२०७००० **संकेतस्थळ :** jnanaprabodhini.org,
**Email : contact @jnanaprabodhini.org**

जरूर पाहा : **छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय (मुंबई)** – देशातील कला–इतिहास–संस्कृतीचा वारसा जतन करणारे संग्रहालय.

शुभेच्छुक - • श्री. धनंजय कुलकर्णी, पुणे • श्री. रमाकांत भुतडा, पुणे
• सौ. संजीवनी आफळे, पुणे • सौ. सपना गांधी, पुणे

ललित

# स्वप्नातली शाळा



– शैलजा देशमुख

**शा**ळा! शाळा म्हणजे अभ्यास, गृहपाठ. शाळा म्हणजे शिस्त. शाळा म्हणजे 'हे असे वागा, असं वागू नका' असे सतत संस्कार करणारी जागा असं काहीसं चित्र मोठ्यांच्या मनात असतं. खरंतर, ही सर्व मोठी माणसं कधीनाकधी शाळेत गेलेली असतात. शाळेतल्या गमतीजमती त्यांनी अनुभवलेल्या असतात, तरीही ते सर्व मोठ्या वयात ते विसरून जातात. पण कवी आ. ना. पेडणेकर यांच्यासारखी, मुलांचं भावविश्व समजून घेणारी, एखादी कवी मनाची व्यक्ती 'गीतांची शाळा'सारख्या कवितासंग्रहातून या शाळेच्या दिवसांतून आपल्याला फिरवून आणते. 'जे न देखे रवी, ते देखे कवी', असं जे म्हटलं आहे, त्याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या कवितांमधून होतो. वास्तवातल्या शाळेपेक्षा जिथे काही वेगळे घडेल, अशी स्वप्नातली शाळा त्यांच्या कवितेतील शाळकरी मुलं पाहात असतात. त्या शाळेविषयी ती म्हणतात,

*''असली शाळा उद्या परवा येईलही जन्मास*
*भूगोलास्तव त्या त्या देशा जाऊन*
*ऐकू नवीन भाषा*
*चाखत द्राक्षे झेलत राहू हिवाळी पाऊस*
*असली शाळा येईल का जन्मास!''*

या शाळेत भूगोल वर्गात बसून शिकायचा नसेल; तर त्या त्या प्रदेशात जाऊन तिथले हवामान, पिकं, जमीन, तिथल्या लोकांची भाषा या सगळ्यांचा तिथे तिथे जाऊन साक्षात अनुभव घेण्याची संधी त्या शाळेत मिळेल! त्या-त्या देशात जाणं ही तर फारच अद्भुत गोष्ट झाली, निदान आपण जिथे राहतो त्या भागाचा इतिहास, भूगोल तरी मुक्तपणे अनुभवून शिकायला मिळेल का? असा प्रश्न मुलांच्या मनात असावा. या शाळेत शिक्षक इतिहास नीरसपणे न शिकवता, मुलांना रंगवून भूतकाळात नेतील. शिवाजी महाराजांचा इतिहास शिकायला आपल्या गावाजवळच्या एखाद्या किल्ल्यावर जाऊन महाराजांचा इतिहास गोष्टीरूपाने अनुभवता येईल. कंटाळा आला की, शाळेची घंटा वाजेल; तरीही तिथे अभ्यासात खूप मजा असेल. या शिकण्याच्या प्रक्रियेचे किती सुंदर वर्णन कवीने केलं आहे–

*''हरएक पुस्तक फूल गोजिरे*
*शिकणारे अन् फूलपाखरे*
*ज्ञानाचा मध चाखायला*
*असेल सकला ध्यास''*

मधल्या सुट्टीत भराभर डबा खाऊन खेळण्याचा आनंद तुम्ही आम्ही अनुभवत असतोच. परंतु या शाळेतील शिक्षा तरी पाहा किती गंमतीशीर आहे! कवी म्हणतो,

**यापुढील लेख**
**मूळ दिवाळी अंकात वाचा**

छात्र प्रबोधन ४०० वा अंक

या वाटेवर मिळून सारे, गीत उद्याचे गाऊ ।
आव्हानांचे पर्वत झेलून, भविष्य उज्ज्वल घडवू ।।

शुभेच्छुक - • डॉ. सौ. वर्षा बखले, चेंबूर, मुंबई • सौ. अमृता रायारीया, अहमदाबाद, गुजरात
• सौ. वृषाली दाते, पुणे • सौ. सुलभा फडके, पुणे, कै. रामचंद्र जनार्दन काळे स्मरणार्थ




# ऑपरेशन फिनाले

- रवींद्र गुर्जर

१९६० साल उजाडलं. दिवस होता ११ मे. याच दिवशी त्या माणसाचं अपहरण करण्यात आलं. कोण होता तो माणूस? आणि त्याचा अपराध काय होता? वाचू या सोबतच्या रोमांचक कथेतून...

दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना देशाची राजधानी '*ब्युनोस आयर्स*'. तिथल्या उत्तर विभागातील एक सुनसान रस्ता. संध्याकाळची वेळ. अंधार पडू लागला होता; एक बस आपल्या *स्टॉपवर* थांबली. त्यातून एक ५०-५५ वर्षांची व्यक्ती खाली उतरली आणि इच्छित दिशेला चालू लागली. ती १०-२० पावलं गेली असेल, तेवढ्यात एक गाडी वेगानं तिच्याजवळ येऊन थांबली. त्यातून दोन जण बाहेर पडले आणि वेगानं त्या व्यक्तीजवळ जाऊन तिची उचलबांगडी केली. त्या व्यक्तीने सुटण्याची केविलवाणी धडपड केली; पण दोघांच्या बळकट पकडीमुळे ते शक्य झालं नाही. त्याला गाडीत



कर्तव्याची जाणीव ठेवूनी, कष्टांची नच खंत करू ।
या देशाच्या उज्ज्वलतेस्तव, रात्रीचाही दिवस करू ।।

शुभेच्छुक - • श्री. योगेश कुलकर्णी, पुणे • श्री. संदीप आंबेकर, पुणे
• श्री. माधव जोशी, पुणे • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे



कोंबून झाल्यावर त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधण्यात आली. गाडी पुन्हा वेगानं निघाली.

काही वेळानं एका घरापाशी ती गाडी थांबली. पट्टी बांधलेल्या माणसाला आत खोलीत नेऊन त्याच्या तोंडावरही एक कपडा घट्ट आवळण्यात आला. त्याला एका खुर्चीला बांधण्यात आलं आणि नंतर ती खोली बाहेरून बंद करण्यात आली.

कैदी माणूस आपल्या अज्ञात भवितव्याचा अगतिकपणे विचार करू लागला.

*'ॲडॉल्फ हिटलर'*नं ३० एप्रिल, १९४५ रोजी आत्महत्या केली आणि २ सप्टेंबरला दुसरे जागतिक महायुद्ध समाप्त झाले होते. अनेक जर्मन नाझी अधिकाऱ्यांना पकडण्यात आलं आणि त्यांच्या गुन्ह्यांनुसार मृत्युदंडासह योग्य त्या शिक्षा देण्यात आल्या. तथापि काही युद्ध गुन्हेगार पळून जाण्यात यशस्वी झाले. आणि आपलं नाव, गाव बदलून देशोदेशी दडून राहिले. त्यांना शोधण्याचे कसोशीचे प्रयत्न अनेक गुप्तहेर संघटनांकडून - खास करून इस्राईलच्या 'मोसाद' या गुप्त यंत्रणेकडून चालू होते. काही जणांना पकडण्यात यश आलं, तर काही गुन्हेगार नैसर्गिक मृत्यू येऊन कायमचे सुटले.

१९६० साल उजाडलं. दिवस होता ११ मे. याच दिवशी सुरुवातीला उल्लेख केलेल्या माणसाचं अपहरण करण्यात आलं. कोण होता तो आणि त्याचा अपराध काय होता?

तो होता दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ६० लाख ज्यूंचे हाल केले, त्याला कारणीभूत असलेला क्रूर कर्दनकाळ *'ॲडॉल्फ आईकमन.'* होय, जगावर वर्चस्व मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेनं झपाटलेल्या हिटलरचं आणि त्याचं नाव एकच होतं! तो आपलं नाव बदलून अर्जेंटिनामध्ये एका कंपनीत नोकरी करत शांत आयुष्य जगत होता; पण त्याला रात्री शांत झोप लागत असेल का? तोच एकमेव जाणे! कदाचित विसाव्या शतकातील सर्वांत कुप्रसिद्ध गुन्हेगार. पंधरा वर्षे 'मोसाद' त्याला पकडण्यासाठी आकाश-पाताळ एक करत होती. अखेर तो 'उघडकीस' कसा आला? फार थरारक आणि रोमांचकारक कहाणी आहे ही.

एवढा मोठा युद्ध - गुन्हेगार आपली ओळख लपवून एवढा दीर्घ काळ लपून कसा राहतो? कितीही प्रयत्न केला तरी एखादा कच्चा धागा मागे राहतोच. *ब्यूनोस आयर्स* मधल्या एका ज्यू नागरिकानं हिटलरच्या छळ छावणीत नरक यातना भोगल्या होत्या. त्याच्या सुदैवानं तो जिवंत बाहेर पडला. त्याच्या कानावर अशी माहिती आली की, एक तरुण मुलगा सारखा सांगत असतो की त्याच्या वडिलांचे उच्चपदस्थ नाझी अधिकाऱ्यांशी, अगदी हिटलरशीसुद्धा जवळचे संबंध होते. वडिलांचं नाव *आईकमन* असं तो सांगत होता.

**यापुढील कथा**
**मूळ दिवाळी अंकात वाचा**



**जरूर पाहा : नेहरू तारांगण (मुंबई)-** खगोलशास्त्रीय घटनांविषयी माहिती, तारांगणामध्ये दाखवलेली अवकाश चित्रगृहे (स्काय थिएटर) अतिशय लोकप्रिय आहेत.

शुभेच्छुक - • वैद्य प्रयाग सेठिया, पुणे • डॉ. सुखदा कुलकर्णी, पुणे
• श्री. विकास देशपांडे, सातारा • श्री.अनिल चव्हाण, सातारा

# ‘संयमा’चं उलगडलेलं कोडं!

- स्वप्नीला सेठिया

ओवी आणि वरद शाळेसाठी सायकलवर जात होते. मध्येच *सिग्नल* लागला.

**ओवी** : वरद, चल ना पुढे. कशाला थांबलाय?

**वरद** : ओवी, अगं *सिग्नल* सुरू आहे.

**ओवी** : चालतंय रे, बघ किती माणसं जात आहेत.

**वरद** : पण *सिग्नल* मोडणं चूक आहे. मी नाही मोडणार.

**ओवी** : नको मोडू; पण मला शाळेत वेळेत जायचं आहे, मी मोडणार. तसंही मी काही एकटीच मोडत नाहीये.

**दुपारी घरी परत आल्यावर**

**वरद** : आई, सोयरामावशी, आज काय झालं माहितीये? ओवीनं शाळेत जाताना *सिग्नल* मोडला.

**सोयरा मावशी** : काय? पण का?

**ओवी** : तू गप रे चोंबड्या. किती अर्धवट सांगतो आहेस! अगं मावशी शाळेत वेळेत जाणं महत्त्वाचं होतं. *सिग्नलला* थांबले असते, तर शाळेला उशीर झाला असता.

**आई** : मग वरद उशिरा पोहोचला का शाळेत?

**ओवी** : अंऽऽ नाही. वेळेतच पोहोचला. मला तसंच वाटलं गं आणि कितीतरी जण जातच होते पुढे. काही होत नाही.

**सोयरा मावशी** : खरं आहे, की आपल्याकडे खूप जण नियम मोडताना दिसतात; पण ते तसं करतात, म्हणजे तेच बरोबर आहे असं नाही ना! तुला असं वाटत नाही का की, तुझं काही चुकलं आहे?

**ओवी** : नाही. शाळेत जाण्यासाठी मला घाई होती.

**सोयरा मावशी** : घाई नव्हती, तर तुझा संयम, निर्धार कमी पडला. मला सांग, परवा चतुर्थीला, गणपतीच्या देवळात तुझा आणि तिथल्या माणसांचा वाद झाला, तो कशासाठी?

**वरद** : मी सांगतो मावशी. आम्ही दर्शनाच्या रांगेत २०-२५ मिनिटं थांबलो होतो. तर आमच्या पुढच्या माणसाने मध्येच त्याच्या ४-५ मित्रांना घुसवलं. मग ओवीताई चिडली आणि भांडली.

**सोयरा मावशी** : का गं? तेव्हा का भांडलीस?

**ओवी** : म्हणजे काय? आम्ही किती वेळ दर्शन घ्यायला ओळीत उभे हातो, वाट बघत होतो आणि ही माणसं आली थेट पुढे; म्हणजे आम्ही शिस्तीत वाट बघणारे काय मूर्ख आहोत का?

**सोयरा मावशी** : अगदी बरोबर, शिस्तीत वाट बघणं म्हणजे संयम बाळगणं, गणपतीचं दर्शन घेणं महत्त्वाचंच;

**यापुढील लेख**
**मूळ दिवाळी अंकात वाचा**





# मी पण हुशार आहे

– नीलम माणगावे

''साक्षी'', साक्षीच्या आईनं जरा जोरातच हाक मारली.

''काय गं..?'' साक्षी पण बसल्या जागेवरूनच ओरडली.

''*गॅसवर* दूध तापवायला ठेवलंय, उतू जाईल बघ.''

साक्षी चिडलीच. 'या मोठ्या लोकांचं काही समजतच नाही..' मनातल्या मनात म्हणाली, 'जरा अभ्यास सोडून इकडे तिकडे गेलं की आई ओरडते आणि आता?' साक्षीला रागच आला आईचा.

'दूध तापवायला ठेऊन कपडे कशाला धुवायला जायचं? किंवा कपडे धुवून आल्यानंतर मग दूध तापवायला ठेवायचं; पण नाही.'

साक्षी रागातच उठली. पाय आपटतच *गॅस*/शेगडी समोर जाऊन उभी राहिली. गॅसच्या एका शेगडीवर पाणी आणि दुसऱ्या शेगडीवर दूध होतं.

दोन्हीकडचे गॅस चालू होते. साक्षी बघत राहिली. एकदा पाण्याकडं, एकदा दुधाकडं.

पाण्यातून आणि दूधातून वाफा यायला लागल्या. वाफा वर वर जायला लागल्या. साक्षी बघतच राहिली, दोन्ही वाफांकडे. तिला गंमतच वाटायला लागली. वाफेला आवाज नव्हता; पण ती दिसत होती. वाफेला रंगही नव्हता. पांढरट असणारी वाफ आता जोरात यायला लागली. म्हणजे पाणी आणि दूध आता जास्त तापायला लागलं.

साक्षीनं गंमत म्हणून पाण्याच्या वाफेवर एक तळहात धरला आणि दुधाच्या वाफेवर दुसरा तळहात धरला. चटका बसताच तिने हात बाजूला केला. मग वाफेच्या अधिक उंचीवर हात धरले. आता चटका बसत नव्हता; पण वाफ गरम असल्याचं जाणवत होतं.

काही सेकंदातच तळहात ओले झाले होते. याचा अर्थ वाफेत पाण्याचा अंश असतो. बरोब्बर. तिला आठवलं, शाळेत शिकवलं होतं की, समुद्रातल्या पाण्याची वाफ होते. ती वर जाते. त्याचे ढग होतात मग पाऊस पडतो.

**यापुढील कथा मूळ दिवाळी अंकात वाचा**





पोकळ स्वप्ने पाहण्यात, कसली आलीये मौज ।
ठेवा दिवसागणिक, सज्ज प्रयत्नांची फौज ।।

# मनामनातून आज गर्जू दे...

मनामनातून आज गर्जू दे राष्ट्रशक्तीची ललकारी
साद घाल तू निजबाहूंना, मुक्त नभी अन् घेई भरारी ॥ ध्रु. ।

गतकाळाचे डिंडिम का हो उगाच पिटता, उरिपोटी
या शतकाचे साहस थिजले? स्फूर्तीला का ही ओहोटी?
'भाळी मिरवीन वांझ वारसा' पुरुषार्थाची का ही कसोटी?
संभ्रम का हा? बुद्धिभेद का? विद्ध मनाला तूच विचारी ॥ १ ॥

कोटिकरांची उधळण येथे, भूमी सुजला सुफला ही
ज्ञान भक्तीच्या संयोगाने, प्रखर बुद्धिने शोभविली
संघटनेची चिन्गारीही मनामनातच रुजलेली
का ह्याची विस्मृती? कशास्तव आत्मशक्तीला आव्हेरी? ॥ २ ॥

विचार आणिक विवेक चित्ती, जागृत व्हावी विजिगीषा
डोळ्यांना परि भुलवित आहे, मोहमयी ही अभिलाषा
सत्ता, स्पर्धा, भोग देहिचा, अनिर्बंध ही असे लालसा
धुंद मनाला कशी उमजावी आर्त हाक आहे दारी ॥ ३ ॥

देशच माझा – माझी भूमी–माझे दैवत येथील व्यक्ती
हिच्याचसाठी माझा कण–क्षण, हिच्याकारणी माझी शक्ती
हीच स्पंदने जाण हृदयीची, एक मुखी हो अभिव्यक्ती
संघटनेच्या विराट हस्ते ध्येयसिद्धीचा याग करी ॥ ४ ॥

- वाच. अनघा लवळेकर

पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

भेदण्यास आकाशाला, मग नित्य कल्पना नव्या ।
देहाला अन् पंखांना, नित्य नव्या भराऱ्या हव्या ॥

शुभेच्छुक - • श्री. श्रीकृष्ण कोनकर, बंगळुरू, कर्नाटक • सौ. वर्षा राकेश जगदाळे, पुणे

सौर कार्तिक शके १९४७/नोव्हेंबर २०२५/दीपावली विशेषांक, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक: (SDM/Pune/SR/139/2017)



**कैं. वाच. स्वर्णलताताई भिशीकर**

१ मे १९५१ – ३ मार्च २०२५

- १९६७ पासून ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ समर्पित कार्यकर्त्या
- युवती विभाग, प्रज्ञा मानस संशोधिकेमध्ये कामास प्रारंभ
- प्रबोधिनीच्या पहिल्या दोन संचालकांच्या स्वीय सचिवा
- सोलापूर-हराळी येथील प्रबोधिनीच्या कार्याच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान
- सिद्धहस्त लेखिका, कवयित्री, अनुवादिका, भरीव साहित्यिक योगदान
- उपनिषदे, पातंजल योगसूत्रे व अन्य आध्यात्मिक ग्रंथांवर ओघवती प्रवचने, आध्यात्मिक साधिका

## असति का ऐसे कुणी?...

बहुत असती जे यशाचे मिरविती माथी तुरे
वैभवाची शीग चढता म्हणती ना केव्हा पुरे
यश-सुखाची मीठ मोहर मातृमुखी ओवाळुनी
मुक्त झाले जीवनी या असति का ऐसे कुणी।

रेखिल्या परिघात ज्यांची रमुनी गेली मनमती
बहुत ऐसे घरकुलाच्या सुखद स्वप्नी रंगती
होऊनी नि:संग परि जे श्रमती विजनी काननी
हिंदुराष्ट्रा जे समर्पित असति का ऐसे कुणी।

शिंपिती फुलबाग कोणी फुलविती वनवैभवे
रम्य उद्याने कुणाची गंध भरले ताटवे
बांधवांच्या आर्त हृदयी मेघसे ओसंडुनी
शिंपिती जे प्रेम अपुले असति का ऐसे कुणी।

उजळती कोणी पसा अन् उजळती अंगण कुणी
उजळती देवालये अन् उजळती नगरे कुणी
त्रिभुवनाला उजळणारे प्रखर ते तेजोमणी
प्राणदायी जे प्रचोदक असति का ऐसे कुणी।

वरील गीत ज्यांनी रचले व त्यानुसार स्वतःचे व अनेकांचे जीवन फुलवले, उजळवले

**अशा मा. लताताईंना चिन्मयी, प्रतिभा, विजय भांबुरकर व छात्र प्रबोधनतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!**

AN ISO 9001:2015 COMPANY
SHIVSHAKTI PAINTS
Industrial paints and coatings specialists

3, Apoorva Apartments, S. No. 8, Tapodham Road,
Warje, Pune - 411058. Maharashtra. India.
Phone : +91-20-25230 890/250
Whatsapp No. : 8806737707
e : info@shivshaktipaints.com
shivshaktipaints@gmail.com
www. shivshaktipaints.com

Celebrating 30+ GLORIOUS YEARS

- सर्व **देणगीदार, जाहिरातदार** यांच्या अर्थसाहाय्यामुळे हा दिवाळी अंक रु. ६० या सवलतीच्या किंमतीत १५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आला.
- सर्व **लेखक, चित्रकार** यांच्या दर्जेदार साहित्यकृती, चित्रकृतींमुळे हा दिवाळी अंक आशयसंपन्न व देखणा करता आला.
- सुमारे ५८ गावांमधील **केंद्रप्रमुख-कार्यकर्ते-प्रबोधनदूत-शिक्षक, विद्यार्थी** यांनी प्रकाशनपूर्व नोंदणी करत हजारो विद्यार्थ्यांपर्यंत हा दिवाळी अंक पोहोचवला.

*छात्र प्रबोधन परिवारातील या सर्वांना मनापासून धन्यवाद व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!*

मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
दूरभाष : ०२०-२४२०७१७४/१७५, संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org



प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १६ आश्विन शके १९४७, (८ ऑक्टोबर २०२५) **वार्षिक वर्गणी ₹ ४००, या अंकाची किंमत ₹ १२०/-**
मासिकाच्या नोंदणीसाठी व पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी – **www.jpprakashane.org**